
# मराठी व्याकरण




## नागेश गायकवाड

विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट संचलित
आत्मा मालिक करिअर डेव्हलपमेंट ॲकॅडमी
कोकमठाण, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर
९८२३६७१५८७

## सर्वनामे

नामांचा पुनरुच्चार किंवा पुनर्वापर टाळण्यासाठी सर्व प्रकारच्या **नामांच्या जागी येणा-या विकारी शब्दाला सर्वनाम असे म्हणतात.**

***प्रकार :*** 1. पुरुषवाचक सर्वनाम

2.दर्शक सर्वनाम

3. संबंधी सर्वनाम

4. प्रश्नार्थक सर्वनाम

5. सामान्य सर्वनाम / अनिश्चित सर्वनाम

6. आत्मवाचक सर्वनाम

### 1. पुरुषवाचक सर्वनामे :

बोलणा-याच्या किंवा लिहिणा-याच्या दृष्टीने जगातील सर्व वस्तूंचे तीन वर्ग पडतात : बोलणा-यांचा, ज्यांच्याशी आपण बोलतो किंवा लिहितो त्यांचा आणि ज्यांच्याविषयी आपण बोलतो किंवा लिहितो त्या व्यक्तींचा व वस्तूंचा. व्याकरणात यांना **पुरुष** असे म्हणतात.

या तीनही वर्गांतील नामांबद्दल येणा-या सर्वनामांना पुरुषवाचक सर्वनामे असे म्हणतात.

अ) बोलणारा स्वत:चा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो ती प्रथमपुरुषवाचक सर्वनामे.

उदा : मी, आम्ही, आपण, स्वत:

ब) ज्याच्याशी बोलायचे त्याचा उल्लेख करतातना जी सर्वनामे वापरतो, ती द्वितीयपुरुषवाचक सर्वनामे.

उदा : तू, तुम्ही, आपण, स्वत:

क) ज्यांच्याविषयी बोलायचे त्या व्यक्ती किंवा वस्तू यांचा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो, ती तृतीय पुरुष वाचक सर्वनामे .

उदा : तो, ती, ते, त्या.

### 2. दर्शक सर्वनामे :

जवळची किंवा दूरची वस्तू दर्शविण्यासाठी जे सर्वना येते, त्यास दर्शक सर्वनाम म्हणतात.

उदा. हा, ही, हे, तो, ती, ते.

### 3.संबंधी सर्वनामे :

वाक्यात पुढे येणा-या दर्शक सर्वनामांशी संबंध दाखविणा-या सर्वनामांना संबंधी सर्वनाम असे म्हणतात. उदा : जो-जी-जे, जे-ज्या.

### 4.प्रश्नार्थक सर्वनामे :

ज्या सर्वनामांचा उपयोग वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी होतो, त्यांना प्रश्नार्थक सर्वनामे म्हणतात. उदा : कोण, काय, कोणास, कोणाला, कोणी, इ.

### 5.सामान्य किंवा अनिश्चित सर्वनामे :

कोण, काय ही सर्वनामे वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी न येता ती कोणत्या नामाबद्दल आली आहेत, हे निश्चितपणे सांगता येत नाही, तेव्हा त्यांना अनिश्चित सर्वनामे म्हणतात.

उदा : अ) **कोणी कोणास** हसू नये.

ब) या जगाचे **काय** होईल, **कुणास** ठाऊक.

क) जगी सर्वसुखी असा **कोण** आहे.

ड) त्या दुकानात **काय** वाटेल ते मिळते.

इ) देवाच्या मर्जीपुढे कोणाचे **काय** चालणार.

फ) तिकडे **कोण** आहे, ते मला माहीत नाही.

ग) **कोणी** यावे, **कोणी** जावे.

ह) **कोण** ही गर्दी .

### 6. आत्मवाचक सर्वनामे :

आपण या सर्वनामाचा अर्थ जेव्हा स्वत: असा होतो, तेव्हा ते आत्मवाचक सर्वनामे असते.

**आपण व स्वत: ही दोन्ही सर्वनामे पुरुषवाचकही असतात. या दोहोंमधील फरक :**

अ) **पुरुषवाचक आपण** हे केवळ अनेकवचनात येते. आत्मवाचक **आपण** हे दोन्ही वचनात येते.

ब) **पुरुषवाचक आपण** हे वाक्याची आरंभी येऊ शकते. आत्मवाचक **आपण** तसे येत नाही.

क) **आपण** हे आम्ही व तुम्ही या अर्थाने येते, तेव्हा ते **पुरुषवाचक** असते. व स्वत: या अर्थाने येते, तेव्हा ते आत्मवाचक असते.

### **आपण** चा **पुरुषवाचक** सर्वनाम म्हणून उपयोग :

1. तुझ्या सांगण्यावरून **आपण** त्याच्याशी भांडणार नाही.

या वाक्यात **आपण** म्हणजे **मी**. प्रथमपुरुष एकवचन.

2. आम्ही ठरवले आहे की, **आपण** सहलीला जाऊ.

या वाक्यात **आपण** म्हणजे **आम्ही**. प्रथमपुरुष अनेकवचन

3.शिक्षक विद्यार्थिनीला उपरोधाने म्हणाले, **आपण** रडणे थांबवून बोलाल का

या वाक्यात **आपण** म्हणजे **तू**. द्वितीय पुरुष एकवचन.

4. मी देवळात गेलो, तेव्हा **आपण** इकडे घरी आलात .

या वाक्यात **आपण** म्हणजे **तुम्ही**. द्वितीय पुरुष अनेकवचन

5.सुरेशने मला शाळेत सोडले आणि **आपण** मात्र आलाच नाही.

या वाक्यात **आपण** म्हणजे **तो**. तृतीय पुरुष अनेकवचन

6. नेत्यांनी कामगारांना बाहेर थांबविले आणि **आपण** चर्चेसाठी मालकांकडे गेले.

या वाक्यात **आपण** म्हणजे **ते**. तृतीय पुरुष, अनेकवचन.

वरील सर्व वाक्यातील **आपण** हे सर्वनाम पुरुषवाचक आहे

**आपण व स्वत: चा आत्मवाचक सर्वनाम म्हणून उपयोग**

1. मी **आपण**हून त्या ठिकाणी गेलो.
2. नागरिकाने **आपण**ाला राष्ट्रभक्त मानले पाहिजे.
3. त्याने **स्वत:**हून गुन्हा कबूल केला.
4. तो **स्वत:** उठला व गाणे म्हणू लागला.
5. मी **स्वत:** त्याला पाहिले.
6. तुम्ही **स्वत:**ला काय समजता

## सर्वनामांचा लिंगविचार :

**मराठीत मूळ सर्वनामे ९ :**

1. मी, 2. तू, 3. तो, 4. हा, 5. जो,

6. कोण, 7. काय, 8. आपण, 9. स्वत:

यातील लिंगानुसार बदलणारी सर्वनामे तीनच आहेत.

1. तो : तो-ती-ते

2.हा : हा-ही-हे

3.जो : जो-जी-जे

याशिवाय इतर सर्व सर्वनामांची तीनही लिंगातील रुपे सारखीच राहतात. ती बदलत नाहीत.

## सर्वनामांचा वचनविचार :

9 सर्वनामांपैकी 5 सर्वनामे वचनभेदाप्रमाणे बदलतात.

1. मी-आम्ही

2.तू-तुम्ही


3. तो-ती,ते, त्या,
4. हा- ही,हे,ह्या,
5. जो- जी,जे, ज्या

सर्वनामाचे लिंग व वचन ते ज्या नामाकरिता आले असेल, त्यावर अवलंबून असते.

## विशेषण

**विशेषण :** नामाबद्दल विशेष माहिती सांगून नामाची व्याप्ती मर्यादित करणारा शब्द म्हणजे विशेषण.

**विशेष्य :** ज्या नामाबद्दल विशेषण अधिक माहिती सांगते त्या नामाला विशेष्य असे म्हणतात.




**1. गुणविशेषण :** ज्या विशेषणाच्या योगाने नामाचा कोणत्याही प्रकारचा गुण/ अवगुण किंवा विशेष दाखविला जातो, त्यास गुणविशेषण असे म्हणतात.

उदा : मोठी मुले, आंबट, शुभ्र, शूर, सुंदर, वाईट, दुष्ट, इ.

**2. संख्याविशेषण :** ज्या विशेषणाच्या योगाने नामाची संख्या दाखविली जाते, त्यास संख्याविशेषण म्हणतात.

**अ) गणनावाचक संख्याविशेषण :**

- पूर्णांक वाचक : एक, दोन, तीन....शंभर, लाख, कोटी
- अपूर्णांक वाचक : पाव, अर्धा, पाऊन, तीनपंचमांश
- साकल्य वाचक : दोन्ही, तिन्ही, चारही,

**ब) क्रमवाचक संख्याविशेषण :**

पहिला, दुसरा, आठवी, साठावे, शंभरावे

क) आवृत्तीवाचक संख्याविशेषण :

चौपट, दसपट, द्विगुणित, दुहेरी, इ.

ड) पृथकत्ववाचक संख्याविशेषण :

एकेक, दहा-दहा, शंभर-शंभर, इ.

इ) अनिश्चित/सामान्य संख्याविशेषण :

सर्व, थोडी, काही, इतर, इत्यादी, इ.

3. सार्वनामिक विशेषण :

सर्वनामांपासून बनलेल्या विशेषणांना सार्वनामिक विशेषणे किंवा सर्वनामसाधित विशेषणे असे म्हणतात.

उदा : मी- माझा, तू-तुझा, तो-त्याचा, आम्ही-आमचा, तुम्ही-तुमचा, ती-तिचा,

हा-असला, असा, इतका, एवढा, अमका

तो- तसा, तसला, तितका, तेवढा, तमका

जो- जसा, जसला, जितका, जेवढा

कोण- कोणता, केवढा

काय - कसा, कसला

## नामे, धातुसाधिते व अव्ययसाधिते यांचा विशेषणांसारखा उपयोग होतो.

1. नामसाधित विशेषणे :

नामांपासून साधलेली विशेषणे.

उदा. समाज- सामाजिक, कला-कलावंत, सातारा-सातारी, नगर-नगरी, कोल्हापूर-कोल्हापूरी, राग-रागीट, माया-मायाळू, बुद्धीमान, धन-धनवान, कापड- कापडदुकान, फळ-फळभाजी,

2. धातुसाधित विशेषण :

धातूंपासून बनलेली विशेषणे.

उदा : हस-हसरा, पिक-पिकलेला, रांग-रांगणारा, वाह-वाहती, पेट-पेटती, बोल-बोलकी

3. अव्ययसाधित विशेषणे :

अव्ययांपासून बनलेली विशेषणे .

उदा: वर-वरचा, खाली-खालील, मागे-मागील, पुढे-पुढची, इ.

अधिविशेषण/ पूर्व विशेषण :

विशेषणे सामान्यत: विशेष्याच्या पूर्वी येतात, त्यांना अधिविशेषण किंवा पूर्व विशेषण म्हणतात.

उदा : **चांगला** मुलगा सर्वांना आवडतो.

विधि- विशेषण :

काही वेळा विशेषण विशेष्याच्या नंतर येतात. त्यांना विधि विशेषण किंवा उत्तर विशेषण म्हणतात. उदा: मुलगा **हुशार** आहे. गणेशचे अक्षर **सुंदर** आहे

क्रियाविशेषण :

काही विशेषणे क्रियापदाबाबत अधिक माहिती सांगतात. अशा विशेषणांना क्रियाविशेषणे म्हणतात. मात्र काही वेळा ती अव्यये नसतात. ती विकारी असतात, म्हणजे ती नामाच्या लिंग, वचन यानुसार बदलात. त्यांना क्रियाविशेषण सव्यय म्हणतात.

उदा : मुलगा चांगला खेळतो- मुलगी चांगली खेळते- ते चांगले खेळतात.

या वाक्यात चांगला हे क्रियाविशेषण आहे, मात्र ते कर्त्याच्या लिंग, वचनानुसार बदलत आहे, म्हणून ते क्रियाविशेषण सव्यय आहे.

शहाणा-शहाणी-शहाणे-शहाण्या

मोठा-मोठी-मोठे-मोठ्या

# क्रियापद

वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा क्रियावाचक शब्द म्हणजे क्रियापद.

उदा : अ) गाय दूध देते.

ब) मुलांनी खरे बोलावे.

क) आमच्या संघाने ढाल जिंकली.

या वाक्यांमध्ये देते, बोलावे, जिंकली या शब्दांनी वाक्यातील क्रिया दाखविल्या आहेत तसेच त्यांनी वाक्याचा अर्थही पूर्ण केला आहे. त्यामुळे अशा शब्दांना क्रियापदे म्हणतात.

**आई रोज देवाला जाऊन येते.**

या वाक्यात क्रिया दाखवणारे दोन शब्द आहेत. जाऊन व येते. हे शब्द जाण्याची व येण्याची क्रिया दाखवतात. पण जाऊन या क्रियावाचक शब्दाने त्या वाक्याचा अर्थ पूर्ण होत नाही. येते या क्रियावाचक शब्दाने तो अर्थ पूर्ण होतो. म्हणून जाऊन हे क्रियापद नसून वाक्यात येते हे क्रियापद आहे.

**धातू :** वरील वाक्यात येते या क्रियापदात मूळ शब्द ये हा असून त्याला ते हा प्रत्यय लागलेला आहे आणि त्यापासून येते हे क्रियापदाचे रूप बनलेले आहे.

क्रियापदातील प्रत्ययरहित मूळ शब्दाला धातू असे म्हणतात.

## धातुसाधिते किंवा कृदन्ते :

धातूला प्रत्यय लागून क्रियापदाची विविध रूपे बनतात.

उदा : बस : बसतो-बसला-बसतात

धातूंपासून बनलेली ही रूपे वाक्याचा अर्थ पूर्ण करतात.

मात्र , गा : गाणे-गाऊन-गाताना ही देखील धातूपासून तयार झालेली रूपे आहेत.ती वाक्याचा अर्थ पूर्ण करत नाहीत.

उदा : त्याने सर्वांना गाऊन मंत्रमुग्ध केले.

ती आता गात नाही.

या वाक्यांमध्ये गाऊन, गात या क्रियावाचक शब्दांनी वाक्याचा अर्थ पूर्ण होत नाही. त्यामुळे गाऊन, गात ही केवळ धातुसाधिते आहेत.

धावणे आरोग्यासाठी चांगले असते. ( धावणे-धातुसाधित, असते-क्रियापद)

**या मुली पूर्वी फार चांगल्या गात**.या वाक्यातील गात हे वाक्याचा अर्थ पूर्ण करते. म्हणून ते क्रियापद आहे.

धातूला विविध प्रत्यय लागून क्रिया अपुरी दाखविणा-या शब्दांना धातुसाधिते किंवा कृदन्ते असे म्हणतात.

- धातूसाधिते वाक्याच्या शेवटी कधीच येत नाहीत. ते वाक्याच्या सुरुवातीला, किंवा वाक्याच्या मध्ये येतात.
- धातुसाधिते नाम, विशेषण किंवा क्रियाविशेषणाचे काम करतात.
- फक्त संयुक्त क्रियापदातच धातुसाधिते क्रियापदाचे काम करते.

अशा प्रकारे वाक्यातील क्रिया दाखविण्याबरोबरच वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा शब्द ही क्रियापदाची व्याख्या महत्वाची आहे. वाक्यात क्रिया दाखवणारे आणखी काही शब्द असू शकतात, पण ते वाक्याचा अर्थ पूर्ण करत नाहीत.

उदा : जहाज समुद्रात बुडताना मी पाहिले

हसणा-याकडे आपण लक्ष देऊ नये.

तंबाखू खाणारी माणसे कर्करोगाला बळी पडतात.

या वाक्यांमध्ये बुडताना, हसणारा, खाणारी हे शब्द त्या वाक्यांमध्ये क्रिया तर दाखवतात, मात्र वाक्याचा अर्थ पूर्ण करीत नाहीत. म्हणून ती क्रियापदे नाहीत. ती धातुसाधिते आहेत.

क्रियापद हा क्रिया दाखवणारा शब्द असला, तरी सर्वच क्रियापदे क्रिया दाखवतात असे नाही.

त्याने मुलाला मारले. या वाक्यातील मारले हा शब्द मारण्याची क्रिया दाखविते.

रावण दुष्ट होता., राम राजा झाला, मी विद्यार्थी आहे.

या वाक्यांमधील होता, झाला, आहे हे शब्द कोणतीही क्रिया दखवित नाहीत, तरीही त्या शब्दांना क्रियापदे म्हणावे लागेल, कारण ते शब्द वाक्याचा अर्थ पूर्ण करतात.

## कर्ता व कर्म

वाक्यात क्रियापदाने दाखविलेली क्रिया करणारा जो कोणी असतो, त्यास कर्ता असेम्हणतात. कर्ता म्हणजे क्रिया करणारा. हा कर्ता क्रियापदाने दाखविलेली क्रिया ज्याच्यावर करतो ते त्याचे कर्म. वाक्यातील क्रियापदाने दाखविलेलीक्रिया कर्त्यापासून निघते व ती दुस-या कोणावर किंवा कशावर तरी घडते.त्या क्रियेचा परिणाम ज्याच्यावर घडतो किंवा ज्याच्याकडे त्या क्रियेचा रोख किंवा कल असतो, ते त्याचे कर्म.

### *वाक्यातील कर्ता व कर्म कसे शोधतात :*

कर्ता शोधताना प्रथम वाक्यातील क्रियापदाचा मूळ धातू शोधून काढावा व त्याला - णारा हा प्रत्यय लावून कोण असा प्रश्न करावा. म्हणजे कर्ता मिळतो.

उदा : 1. राम आंबा खातो.

या वाक्यात खातो या क्रियापदातील खा या धातूला णारा हा प्रत्यय लावून खाणारा कोण असा प्रश्न विचारला की राम हे उत्तर मिळते. म्हणून राम हा कर्ता. वाक्यातील कर्म शोधताना मुख्य क्रियापदाने दाखविलेली क्रिया कोणावर घडते असा प्रश्न करावा. ती क्रिया ज्या वस्तूवर किंवा प्राण्यावर घडते, ते त्याचे कर्म. वरील उदाहरणात खाण्याची क्रिया कोणावर घडते- आंब्यावर. म्हणून आंबा वाक्यातील कर्म.

2. मी बैलाला मारतो.

या वाक्यात मारणारा कोण : मी. म्हणून मी हा या वाक्यातील कर्ता. मारण्याची क्रिया कोणावर घडते : बैलावर. म्हणून बैलाला हे कर्म.

3. विद्यार्थी प्रामाणिक आहे.

या वाक्यात असणारा कोण : विद्यार्थी. म्हणून विद्यार्थी हा या वाक्यातील कर्ता. प्रामाणिक असण्याची क्रिया कोणावर घडते : विद्यार्थ्यावरच. म्हणजे येथे क्रिया कर्त्यापासून पुढे जात नाही, म्हणून या वाक्यात कर्म नाही. आहे हे अकर्मक क्रियापद आहे.

4. मला दूध आवडते.

या वाक्यात आवडते हे क्रियापद आहे. आवड हा मूळ धातू आहे. आवडणारे काय : दूध. म्हणून या वाक्यात दूध हा कर्ता आहे.

त्याला थंडी वाजते : थंडी हा कर्ता

राजाला मुकुट शोभतो : मुकुट हा कर्ता

मला चंद्र दिसतो : चंद्र हा कर्ता.

क्रिया करणारा तो कर्ता व ती क्रिया भोगणारे किंवा सोसणारे ते कर्म.

# क्रियापदाचे प्रकार

**1. सकर्मक क्रियापद :**

ज्या क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची जरूरी असते, त्यास सकर्मक क्रियापद असे म्हणतात. कर्मासह आलेले क्रियापद ते सकर्मक क्रियापद.

उदा : अ) गवळी धार काढतो.

ब) अनुराग निबंध लिहितो.

क) मुकुंद लाडू खातो.

वरील वाक्यांना पूर्ण अर्थ आहे. मात्र या वाक्यांतील अनुक्रमे धार, निबंध, लाडू या कर्मांमुळे त्या वाक्यांना अर्थ प्राप्त झालेला आहे. म्हणजेच काढतो, लिहितो, खातो या क्रियापदांना त्या वाक्यातील कर्मांची जरूरी आहे. अन्यथा वाक्यांना अर्थ प्राप्त होऊ शकला नसता. म्हणून काढतो, लिहितो, खातो ही सकर्मक क्रियापदे आहेत.

**2. अकर्मक क्रियापद :**

कर्त्यापासून निघालेली क्रिया कर्त्यापाशीच थांबत असेल किंवा कर्त्याच्या ठिकाणी लय पावत असेल, तर ते क्रियापद अकर्मक असते.

उदा : अ) मी रस्त्यात पडलो.

ब) आज दीपावली आहे.

क) राम उद्या पुण्याला जाईल.

वरील वाक्यातील मी रस्त्यात पडलो, या वाक्यात पडण्याची क्रिया कर्त्यावरच घडते. ती क्रिया कर्त्यापासून पुढे जात नाही. मी पडलो यात पूर्ण अर्थ आहे. पडलो या क्रियापदाला कर्माची जरूरी नाही. म्हणून पडलो हे क्रियापद अकर्मक आहे. तसेच आहे, जाईल या क्रियापदांना कर्माची गरज नाही. त्यामुळे ती देखील अकर्मक क्रियापदे आहेत. म्हणजे वाक्यात कर्म नसले, तरी वाक्याचा अर्थ स्पष्ट करण्यास क्रियापद सक्षम असते.

**काही अकर्मक धातू :**

अस, नस, हो, ऊठ, बस, नीज, झोप, रड, पड, सड, मर, धाव, थांब, शक, जाग, झीज, वाढ, झड, जळ, उजळ, ओरड, घोर, सळसळ, राह, वाह, उमल, जन्म, पीक, वाज, भीज, रुज, शीज, इ.

**द्विकर्मक क्रियापदे :**

काही वाक्यांमध्ये क्रियापदांना अर्थ पूर्ण करण्यासाठी दोन कर्मे लागतात. अशा क्रियापदांना द्विकर्मक क्रियापदे म्हणतात.

उदा : अ) गुरुजी विद्यार्थ्यांना व्याकरण शिकवतात.

ब) आजीने नातवाला गोष्ट सांगितली.

क) तिने भिका-याला पैसा दिला.

वरील वाक्यांत शिकवतात, सांगितली, दिला ही क्रियापदे सकर्मक असून त्यांना दोन कर्मे आहेत. पहिल्या वाक्यात शिवकवणारे कोण : गुरूजी. गुरूजी हा कर्ता. शिकविण्याची क्रिया कोणावर घडते : व्याकरण व विद्यार्थी या दोहोंवर. यातील वस्तुवाचक कर्मांना प्रत्यक्ष कर्म असे म्हणतात व व्यक्तिवाचक कर्मांना अप्रत्यक्ष कर्म असे म्हणतात.

वरील वाक्यांत व्याकरण, गोष्ट, पैसा ही प्रत्यक्ष कर्मे आहेत, तर विद्यार्थ्यांना, नातवाला, भिका-याला ही अप्रत्यक्ष कर्मे होत. प्रत्यक्ष कर्माची विभक्ती द्वितीया असते तर अप्रत्यक्ष कर्माची विभक्ती संप्रदानी चतुर्थी असते.

**उभयविध क्रियापदे :**

जे एकच क्रियापद हे दोन वेगवेगळ्या वाक्यात सकर्मक व अकर्मक असे दोन्ही प्रकारे वापरता येते, त्यास उभयविध क्रियापद असे म्हणतात.

उदा : कापले, आठवले, स्मरले, लोटले, मोडले, उघडले, इ.

1) त्याने घराचे दार उघडले ( यात उघडले हे सकर्मक क्रियापद)
त्याच्या घराचे दार उघडले ( यात उघडले हे अकर्मक क्रियापद)

2) रामाने धनुष्य मोडले. (यात मोडले हे सकर्मक क्रियापद)
ते लाकडी धनुष्य मोडले ( यात मोडले हे अकर्मक क्रियापद)

**विधानपूरक :**

सकर्मक क्रियापदाला कर्माची आवश्यकता असते. कर्म दिल्याशिवाय सकर्मक धातूसंबंधीचे विधान पूर्ण होत नाही. अकर्मक क्रियापदांना कर्माची आवश्यकता नसते. केवळ कर्ता व क्रियापद एवढयानेच सकर्मक धातूच्या बाबतीत विधान बहुधा पूर्ण होते. परंतु काही अकर्मक धातू असे आहेत की, कर्ता व क्रियापद असूनही त्यांचा वाक्यार्थ अपुरा असतो.

उदा : 1) राम झाला 2) मुलगा आहे 3) आंबा निघाला

उपरोक्त उदाहरणांमध्ये झाला, आहे, निघाला ही क्रियापदे अपु-या विधानांची आहेत. अशा प्रकारच्या क्रियापदांना अपूर्ण विधान क्रियापदे म्हणतात. ती विधाने पूर्ण करण्यासाठी काही शब्दांची आवश्यकता असते.

जसे : 1) राम राजा झाला 2) मुलगा हुशार आहे 3) आंबा नासका निघाला.

या वाक्यांमध्ये राजा, हुशार, नासका हे शब्द अपुरी विधाने पूर्ण करतात. अशा शब्दांना विधानपूरक किंवा पूरक असे म्हणतात.

**संयुक्त व सहाय क्रियापदे :**

1) क्रीडांगणावर मुले खेळू लागली.

2) आपणही आता खेळू

पहिल्या वाक्यातील खेळू हा शब्द खेळण्याची क्रिया दाखविती, पण ती वाक्याचा अर्थ पूर्ण करीत नाही. दुस-या वाक्यातील खेळू या क्रियावाचक शब्दाने मात्र वाक्याचा अर्थ पूर्ण होतो. म्हणून दुस-या वाक्यातील खेळू हे क्रियापद होय. पहिल्या वाक्यातील क्रिया खेळू लागली या दोन शब्दांनी ती क्रिया पूर्ण होते. केवळ लागली या शब्दाने क्रियेचा अर्थ पूर्ण होत नाही. खेळू लागली या संयुक्त शब्दांत खेळू हे धातुसाधित असून लागली या क्रियावाचक शब्दाने खेळण्याची क्रिया पूर्ण करण्यास म्हणजे क्रियापदाचे रुप बनविण्यास साहाय्य केले म्हणून लागली हे सहाय क्रियापद होय.

खेळू लागली हे क्रियापद धातुसाधित व सहाय क्रियापद यांच्या संयोगाने बनले आहे, म्हणून अशा क्रियापदाला संयुक्त क्रियापद असे म्हणतात.

धातुसाधित व सहाय क्रियापद मिळून संयुक्त क्रियापद होते. पण त्याला एक अट असते. ती म्हणजे, या संयुक्त क्रियापदाने दर्शविलेली क्रिया एकच असायला हवी. त्या दोन वेगवेगळ्या क्रिया असून चालणार नाही.

उदा : 1) बाळ, एवढा लाडू खाऊन टाक.


2) बाळ, एवढा लाडू खाऊन जा.

पहिल्या वाक्यात खाऊन टाक हे संयुक्त क्रियापद आहे.येथे खाण्याची व टाकण्याची अशा दोन क्रिया नसून खाऊन टाक याचा अर्थ खा. यातील दोन शब्दांनी एकाच क्रियेचा बोध होतो.

दुस-या वाक्यातील खाऊन जा या शब्दांत खाण्याची व नंतर जाण्याची अशा दोन वेगळ्या क्रिया आहेत. म्हणून खाऊन जा हे संयुक्त क्रियापद नाही. जा हे मुख्य क्रियापद असून खाऊन हे धातुसाधित आहे.

## क्रियाविशेषण अव्यये :

क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगून जे शब्द अविकारी राहतात म्हणजे वाक्यातील लिंग, वचन, विभक्ती इ.च्या बदलामुळे त्यांच्यावर काहीही परिणाम होत नाही, त्यांना क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.




## अर्थावरुन पडणारे प्रकार :

### 1. कालवाचक क्रियाविशेषण अव्यय :

**अ) कालदर्शक :** वाक्यातील क्रिया केव्हा घडली आहे, हे दर्शविणारे शब्द

उदा : आधी, आता, सध्या, तूर्त, हल्ली, काल, उद्या, परवा, लगेच केव्हा, जेव्हा, पूर्वी, मागे, रात्री, दिवसा, इ.

**ब) सातत्यदर्शक :** वाक्यातील क्रियेचे सातत्य दर्शविणारे शब्द.

उदा : नित्य, सदा, सर्वदा, नेहमी, दिवसभर, आजकाल, अद्याप

**क) आवृत्तीदर्शक :** वाक्यात घटनेची पुनरावृत्ती दर्शविणारे शब्द.

उदा : फिरुन, वारंवार, दररोज, पुन्हा पुन्हा, सालोसाल, क्षणोक्षणी, एकदा, दोनदा, इ.

## 2. स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय

**अ) स्थितीदर्शक :** वाक्यातील क्रियेचे ठिकाण/ स्थळ दर्शविणारे शब्द

उदा : येथे, तेथे, जेथे, वर, खाली, कोठे, मध्ये, अलीकडे, मागे, पुढे, जिकडे-तिकडे, सभोवताल, इ.

**ब) गतिदर्शक :** वाक्यातील क्रिया कोठून घडली हे दर्शविणारे शब्द

उदा : इकडून, तिकडून, मागून, पुढून, वरुन, खालून, लांबून, दुरुन

## ३. रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय :

**अ) प्रकारदर्शक :** वाक्यातील क्रिया कशी घडते किंवा तिची रीत दाखवणारे शब्द :

उदा : असे, तसे, जसे, कसे, उगीच, व्यर्थ, फुकट, आपोXाप, मुद्दाम, जेवी, तेवी, हळू, सावकाश, जलद, इ.

**ब) अनुकरणदर्शक :** वाक्यातील क्रिया कशी घडली, हे दाखवणारे अनुकरणवाचक शब्द.

उदा : झटकन, पटकन, पटापट, टपटप, चमचम, बदाबदा, इ.

**क) निश्चयदर्शक :** वाक्यातील क्रियेत निश्चय दर्शविणारे शब्द.

उदा : खचित, खरोखर, नक्की, खुशाल, निखालस, इ.

## 4. संख्यावाचक /परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यय :

वाक्यातील शब्द जेव्हा क्रियेची संख्या किंवा परिमाण दाखविते, तेव्हा त्याला संख्यावाचक/परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.

उदा : कमी, जास्त, किंचित, जरा, काहीसा, थोडा, क्वचित, अत्यंत, अगदी, बिलकुल, मुळीच, भरपूर, अतिशय, मोजके, पूर्ण, इ.

## 5. प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यय :

वाक्यातील का/ना हे शब्द जेव्हा क्रियापदाला प्रश्नार्थक बनवतात, तेव्हा त्यांना प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.

उदा : तू गावाला जातो का

तू आंबा खाणार का
तुम्ही सिनेमाला याल ना
तुम्ही अभ्यास कराल ना

## 6. निषेधार्थक क्रियाविशेषण अव्यय :

वाक्यातील न/ना हे शब्द जेव्हा क्रियेचा निषेध किंवा नकार दर्शवितात तेव्हा त्याला निषेधार्थक क्रियाविशेषण अव्यय म्हणतात.

उदा : मी न विसरता जाईल
तो न चुकता आला
त्याने खरे सांगितले तर ना
मी न चुकता तुला भेटेल

# स्वरुपावरुन पडणारे प्रकार :

## 1. सिद्ध क्रियाविशेषण अव्यय :

काही शब्द मुळातच क्रियाविशेषण असतात, त्यांना क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.

उदा : मागे, पुढे, येथे, तेथे, आज, इ.

## 2. साधित क्रियाविशेषण अव्यय :

नाम, विशेषण, क्रियापद, शब्दयोगी अव्यय यांच्यापासून झालेल्या क्रियाविशेषणांना साधित क्रियाविशेषण असे म्हणतात.

### अ) साधित क्रियाविशेषण :


नामसाधित : रात्री, दिवसा, सकाळी, व्यक्तिशः, वस्तुतः
सर्वनामसाधित : त्यामुळे, यावरुन, कित्येकदा
विशेषणसाधित : मोठ्याने, एकदा, इतक्यात, एकत्र
धातुसाधित : हसू, हसत, हसताना, पळताना, खेळताना
अव्ययसाधित : कोठून, इकडून, खालून, वरुन
प्रत्ययसाधित : शास्त्रदृष्ट्या, मनःपूर्वक, कालानुसार

### ब) सामासिक :

काही जोडशब्द किंवा सामासिक शब्द क्रियाविशेषण अव्ययाचे काम करतात, अशा दोन शब्दांना सामासिक क्रियाविशेषण अव्यय म्हणतात.

उदा : गावोगाव, गैरहजर, गैरकायदा, दररोज, प्रतिदिन, रात्रंदिवस, समोरासमोर, घरोघर, यथाशक्ती, आजन्म, हरघडी,

स्त्री-पुरूष
सूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध)
र्गत सामुदायिक दंड लावणे
कायद्याच्या



## केवलप्रयोगी

① हर्षदर्शक → वा, वावा, आहा, ओहो, आ-हा, अहाहा

② शोकदर्शक → ऊं, ॲः, अरेरे; अयाई, अगाई, हाय हाय, हाय

③ आश्चर्यदर्शक → ऑ, आहो, अबब, बापरे, अहाहा, चक्‌चक्, अरेच्या

④ प्रशंसादर्शक → शाबास, भले, वाहवा, छान, ठीक, फक्कड, खाशी

⑤ संमतिदर्शक → हां, जी, जीहां, ठीक, बराय, हॅं, अच्छा

⑥ विरोधीदर्शक → छे, छट्, हॅट, ऊः, उंहू, च, अहं, छे छे

⑦ तिरस्कारदर्शक → छीक, थुः, शीड, इश्श, हुडुत, हुड, फुस, हत, छत, छी

⑧ संबोधनदर्शक → अगे, अरे, अहो, ए, अगो, बा, रे,

⑨ मौनदर्शक → चुप, चिपू, गप, गुपचीत

माडा :
...गरापुरी बेटे

b) कुरटे बेट
d) जंजीरा
2) a, c, b, d
4) b, a, c, d
महाराष्ट्र रा...

# शब्दयोगी अव्यये

① कालवाचक → आता, पूर्वी, पुढे, आधी, नंतर, पर्यंत, पावेतो, आतून, खालून, मधून, पासून

② स्थलवाचक → आत, बाहेर, मागे, पुढे, मध्ये, अलीकडे, समोर, जवळ, ठायी, पाशी, नजीक, समीप, समक्ष

③ करणवाचक → मुळे, योगे, कडून, द्वारा, करवी, हाती

④ हेतुवाचक → साठी, कारणे, करिता, अर्थी, प्रीत्यर्थ, निमित्त, स्तव

⑤ व्यतिरेकवाचक → शिवाय, खेरीज, विना, वाचून, व्यतिरिक्त

⑥ तुलनावाचक → पेक्षा, तर, तम, मध्ये, परीस

⑦ योग्यतावाचक → योग्य, सारखा, जोगा, सम, समान, प्रमाणे, बरहुकूम

⑧ कैवल्यवाचक → च, मात्र, ना, पण, केवळ, फक्त

⑨ संग्रहवाचक → सुद्धा, देखील, ही, पण, ~~बील~~ केवळ, फक्त

⑩ संबंधवाचक → विशी, विषयी, संबंधी

⑪ साहचर्यवाचक → बरोबर, संगे, सकट, सहित, सवे, निशी, समवेत

⑫ भागवाचक → पैकी, पोटी, आतून

⑬ विनिमयवाचक → बद्दल, ऐवजी, जागी, बदली

⑭ दिक्‌वाचक → प्रति, प्रत, कडे, लागी

⑮ विरोधवाचक → विरुद्ध, उलटे, उलट

⑯ परिणामवाचक – भर.

शुद्ध शब्दयोगी अव्यये

↓

च, देखील, ना, पण, मात्र, सुद्धा, ही.

# सामान्यरूप

## पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप

① 'अ' कारान्त → 'आ' कारान्त
↓
खांब, निर्णय, काळ, वर्ग, पेर, बाक

② 'आ' कारान्त → 'या' कारान्त
↓
घोडा, दोरा, पंखा
(अपवाद - आजोबा, काका, दादा, मामा, बाबा, नाना, चहा, राजा)

③ 'ई' कारान्त → 'या' कारान्त
↓
धोबी, तेली, माळी
(हत्ती, नंदी, ऋषी, मुनी, पाळी)

④ 'ऊ' → वा
↓
भाऊ, विंचू, नातू.

⑤ ए → या (फडके, गोखले)

⑥ ओ → ओ. (किन्नो, हिरो, धनको)

## स्त्रीलिंगी नामांचे सामान्यरूप

① अ → एकवचन → 'ए'
अनेकवचन – आ.
↓
वीट- विटेस, विटांना, जीभ, सून

② 'अ' → ई (काही वेळा)
↓
भिंत, विहीर, पाल

③ 'आ' → ए.
↓
शाळा, भाषा, माता, विद्या

④ 'ई' → एकवचन – 'ई'
अनेकवचन - या
↓
भक्ती, नदी, बी, पेटी, दासी, स्त्री

⑤ 'ऊ' → होत नाही. (क्वचित होते)
↓
काकू, वधू, सासू – सासूला- सासवांना
ऊ.

⑥ ओ → एकवचन – नाही
अनेक – आ.
– बायको, व'

## नपुंसकलिंगी नामांचे सामान्यरूप

① अ → आ.
↓
मूल, पान, दुकान, फूल

② ई → या.
↓
पाणी, मोती, लोणी

③ 'ऊ' → आ.
↓
लिंबू, लेकरू, कोकरू

④ ए → या.
↓
तळे, केळे, खोके, नाणे, डोके.

* एकाक्षरी शब्दाचे सामान्यरूप होत नाही
* परकीय शब्दांचे सामान्यरूप होत नाही
* ग्राम किंवा देशवाचक विशेषणांचे होत नाही

# विभक्ती

वाक्यातील शब्दांचा त्यातील मुख्य शब्दांशी म्हणजे क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी काही ना काही संबंध असतो, या संबंधाला कारक असे म्हणतात.

वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदांशी जे संबंध असतात, त्यांना कारकार्थ असे म्हणतात आणि क्रियापदाशिवाय इतर शब्दांशी असलेले जे संबंध असतात, त्या संबंधांना उपपदार्थ असे म्हणतात.

अशा प्रकारे , नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकरांनी दाखविले जातात त्या विकरांना **विभक्ती** असे म्हणतात.

## विभक्तीचे प्रकार :

प्रत्येक वाक्य म्हणजे एक विधान असते. यात क्रियापद हा प्रमुख शब्द होय. ही क्रिया करणारा वाक्यात कोणीतरी असतो. त्याला कर्ता असे म्हणतात. ही क्रिया कोणावर घडली, कोणी केली, कशाने केली, कोणासाठी केली, कोठून घडली, कोठे किंवा केव्हा घडली, हे सांगणारे शब्द वाक्यात असतात. नामांचा क्रियापदांशी किंवा इतर शब्दांशी असणारा संबंध अशा 8 प्रकारचा असतो. म्हणून विभक्तीचे एकंदर आठ प्रकार मानले जातात.

## विभक्तीचे अर्थ :

### विभक्तीचे मुख्य कारकार्थ 6 आहेत :

**कर्ता :** क्रियापदाने दर्शविलेली क्रिया करणारा वाक्यात कोणीतरी असतो. त्याला कर्ता असे म्हणतात. कर्त्याची विभक्ती केव्हा केव्हा प्रथमा असते. प्रथमेचा प्रमुख कारकार्थ कर्ता होय

उदा : **राम** आंबा खातो.

**कर्म :** कर्त्याने केलेली क्रिया कोणावर घडली हे सांगणारा शब्द म्हणजे कर्म. कर्माची विभक्ती द्वितीया. म्हणजेच द्वितीयेचा कारकार्थ कर्म होय.(हे प्रत्यक्ष कर्म असते) प्रत्यक्ष कर्माची विभक्ती द्वितीया असते तर अप्रत्यक्ष कर्माची विभक्ती संप्रदानी चतुर्थी असते.

उदा : राम **रावणास** मारतो.

**करण :** वाक्यातील क्रिया ज्या साधनाने घडते, किंवा ज्याच्या साधनाने घडते, त्याला करण असे म्हणतात. करण म्हणजे साधन. तृतीयेचा मुख्य कारकार्थ करण आहे.

उदा : आई **चाकूने** भाजी कापते.

**संप्रदान :** जेव्हा क्रिया दानाचा अर्थ व्यक्त करते, तेव्हा ते दान ज्याला करण्यात येते, त्याच्या वाचक शब्दाला किंवा देणे, बोलणे, सांगणे, इ.अर्थाच्या क्रिया ज्याला उद्देशून घडतात, त्या वस्तूला किंवा स्थानाला संप्रदान असे म्हणतात. चतुर्थीचा मुख्य कारकार्थ संप्रदान आहे.

उदा : मी **गुरुजींना** दक्षिणा दिली.

**अपादान :** क्रिया जेथून सुरु होते, तेथून ती व्यक्ती वा वस्तू दूर जाते.म्हणजे क्रियेच्या संबंधाने ज्याच्यापासून एखाद्या वस्तूचा वियोग दाखवायचा असतो, त्यास अपादान असे म्हणतात. पंचमीचा कारकार्थ अपादान आहे.

उदा : मी **शाळेतून** आताच घरी आलो.

**अधिकरण :** वाक्यातील क्रिया कोठे किंवा केव्हा घडली हे क्रियेचे स्थान किंवा काळ दर्शविणा-या शब्दाच्या संबंधास अधिकरण असे म्हणतात. सप्तमीचा मुख्य कारकार्थ अधिकरण आहे.

उदा : दररोज **सकाळी** मी शाळेत जातो.

षष्ठी विभक्तीत शब्दांचा संबंध सामान्यत: क्रियापदाशी येत नाही. दुस-या नामाशी येतो. षष्ठीचा अर्थ संबंध. केव्हा केव्हा षष्ठीलाही कारकार्थ असलेला आढळतो.

उदा : **रामाची** बायको होती सीता.

संबोधनाचा उपयोग हाक मारताना करतात. जे नाम संबोधन म्हणून वापरले जाते, त्याला विकर होतो व प्रत्ययही लागतात. म्हणून संबोधन ही आठवी विभक्ती आहे.

उदा : **रामा**, इकडे ये.

**अशा प्रकारे विभक्तीचे प्रत्यय, विभक्ती व पमुख कारकार्थ पुढीलप्रमाणे आहेत :**

| **विभक्ती** | **प्रत्यय** | **कारकार्थ** |
|---|---|---|
| प्रथमा | प्रत्यय नाहीत | कर्ता |
| द्वितीया | स,ला,ते, ना, | कर्म |
| तृतीया | ने, ए, शी, नी | करण |
| चतुर्थी | स, ला, ते, ना | संप्रदान |
| पंचमी | ऊन, हून | अपादान |
| षष्ठी | चा, ची, चे, च्या, ची | संबंध |
| सप्तमी | त, इ, आ | अधिकरण |
| संबोधन | -, नो | हाक |

## विभक्तीचे प्रत्यय व मूल या नामाची होणारी रुपे

| विभक्ती | एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|---|
| | प्रत्यय | शब्दांची रुपे | प्रत्यय | शब्दांची रुपे |
| प्रथमा | -- | मूल | -- | मुले |
| द्वितीया | स, ला, ते | मुलास, मुलाला | स, ला, ना, ते | मुलांस, मुलांना |
| तृतीया | ने, ए, शी | मुलाने, मूलाशी | नी, शी, ई, ही | मुलांनी, मुलांशी |
| चतुर्थी | स, ला, ते, | मुलास, मुलाला | स, ला, ना, ते | मुलांस, मुलांना |
| पंचमी | ऊन, हून | मुलाहून | ऊन, हून | मुलांहून |
| षष्ठी | चा, ची, चे | मुलाचा, मुलाची | चा, ची, चे | मुलांचा , मुलांची |
| सप्तमी | त, ई, आ | मुलात | त, ई, आ | मुलांत |
| संबोधन | -- | मुला | नो | मुलांनो |

## विभक्ती अर्थावरुन मानावी की, प्रत्ययावरुन :

उदा :

राम **आंबा** खातो

रामाने **चोरास** मारले

वरीलपैकी पहिल्या वाक्यात **आंबा** या शब्दमध्ये द्वितीया विभक्ती असून कारकार्थ कर्म आहे. येथे आंबा शब्दास स, ला, ते असे प्रत्यय लागलेले नाहीत. मात्र तरीही ती द्वितीया विभक्ती आहे (अप्रत्ययी ). दुस-या वाक्यात **चोरास** या शब्दामध्ये देखील द्वितीया विभक्ती आहे, असे आपण निर्विवादपणे म्हणतो. कारण येथे स हा प्रत्यय लागलेला आहे (सप्रत्ययी). दोन्ही वाक्यांमध्ये अनुक्रमे आंबा व चोरास या शब्दांना लागलेल्या विभक्ती प्रत्ययांचा कारकार्थ कर्म आहे.... **त्याने मला मारले.**

या वाक्यातील मला या शब्दातील विभक्ती ओळखा....

उदा : त्याने **केसाने** गळा कापला.

मुलाने **कुत्र्यास** मारले.

वरीलपैकी पहिल्या वाक्यात **केसाने** या शब्दामध्ये तृतीया विभक्ती असून कारकार्थ करण आहे. दुस-या वाक्यात **मुलाने** या शब्दात ने हा प्रत्यय आहे. त्यावरुन ही तृतीया विभक्ती आहे, असे मानता येईल, मात्र **मुलाने** या शब्दातील विभक्तीचा कारकार्थ कर्ता असल्याचे दिसते. मग आता **मुलाने** या शब्दातील विभक्ती कोणती मानायची.... प्रथमा की तृतीया.....

**मी नदीच्या काठाने गेलो.**

या वाक्यातील काठाने या शब्दातील विभक्ती ओळखा..

उदा :

तू **रामाला** पुस्तक दे

तो **मुंबईला** गेला.

वरीलपैकी पहिल्या वाक्यात **रामाला** या शब्दामध्ये चतुर्थी विभक्ती असून कारकार्थ संप्रदान आहे. दुस-या वाक्यात **मुंबईला** या शब्दात ला प्रत्यय आहे. त्यावरुन आपण द्वितीया किंवा चतुर्थी विभक्ती असा निष्कर्ष काढला तर ते अचूक ठरेल का....कारण **मुंबईला** या शब्दातील विभक्तीचा कारकार्थ अधिकरण आहे... .. मग **मुंबईला** या शब्दामध्ये कोणता विभक्ती प्रत्यय आहे.....

उदा :

तो **घरातून** बाहेर पडला

तुझ्या **हातून** हे काम होणार नाही.

वरीलपैकी पहिल्या वाक्यात **घरातून** या शब्दामध्ये पंचमी विभक्ती असून कारकार्थ अपादान आहे. दुस-या वाक्यात **हातून** या शब्दात ऊन प्रत्यय आहे. त्यावरुन आपण येथे पंचमी विभक्ती आहे, असे निर्विवादपणे म्हणू शकतो काय..... प्रत्ययावरुन पंचमी म्हणावं तर, कारकार्थ करण असा आहे.... मग **हातून** या शब्दामध्ये कोणता विभक्ती प्रत्यय आहे....

उदा :

तो **दिवसाचा** झोपतो.

मी **रात्री** घरी परतेन

वरीलपैकी पहिल्या वाक्यात **दिवसाचा** या शब्दामध्ये चा या प्रत्ययावरुन आपण त्यात षष्ठी विभक्ती आहे, असे म्हणू शकतो. मात्र त्यातील कारकार्थ अधिकरण असा आहे. दुस-या वाक्यात **रात्री** या शब्दामध्ये ई प्रत्यय आहे व त्यावरुन या शब्दात सप्तमी विभक्ती आहे व विभक्तीचा कारकार्थ अधिकरण आहे, हे निर्विवाद म्हणता येईल. मग पहिल्या वाक्यातील **दिवसाचा** या शब्दातील विभक्ती कोणती....

**यावरुन आपण निष्कर्ष काढू शकतो की....**

वाक्यात शब्दाशब्दांमधील संबंध प्रत्ययांनी दाखवले जातात. विभक्ती ही या संबंधावरुन म्हणजे अर्थावरुन मानावी की हा अर्थ व्यक्त करणारे जे प्रत्यय असतील, त्यावरुन मानावी, हा वाद नेहमी निर्माण होतो. अर्थाशिवाय प्रत्यय नाहीत आणि प्रत्ययाशिवाय अर्थ व्यक्त करता येत नाही.अर्थ व प्रत्यय हे परस्परांवर अवलंबून असल्यामुळे विभक्ती या प्रत्ययावरुन मानाव्या असे म्हणता येईल.

विभक्ती-विभक्तीमधील फरक प्रत्ययामुळे सहज ओळखता येतो. म्हणून विभक्ती ही कारकार्थावरुन मानण्यापेक्षा प्रत्ययांवरुन मानावी.

विभक्तीमुळे विविध अर्थ आपण व्यक्त करु शकतो. प्रथमेचा अर्थ कर्ता, द्वितीयेचा अर्थ कर्म, असे सामान्यत: गृहित धरले जात असले तरी, एका विभक्तीने दुस-या विभक्तीचे अर्थही आपण व्यक्त करतो.म्हणून विभक्ती ओळखताना त्या शब्दाला कोणता प्रत्यय लागला आहे हे पाहून प्रत्ययावरुन विभक्ती सांगावी. मग विभक्तीचा अर्थ वेगळा असला तरी चालेल.

## पुढील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या विभक्ती व कारकार्थ सांगा.

1) बुधवारी भरणा-या जुन्या बाजारात रेंगाळणं हा बाबांचा आवडता छंद होता.
2) पेशव्यांच्या चढाईने निजामाला पळता भुई थोडी झाली.
3) म्हणून भगवन्, शेवटच्या समराला सामोरी जाताना माझ्या शरीराला व मनाला तेवढे बळ दे.
4) आमच्या विमानाने बॅंकॉकचा तो सुंदर विमानतळ गाठला
5) रुपयाला चार आंबे
6) ती माझी लग्नाची बायको आहे.
7) टाळ्यांच्या गजरात ठराव मान्य झाला.
8) वासरांत लंगडी गाय शहाणी
9) आम्ही विष्णूदास मऊ मेणाहून
10) तो भिंतीशी बसला
11) तो कानाने बहिरा आहे.
12) मी एका घावात दोन तुकडे केले.
13) मी तुझ्यापायी बुडालो
14) त्याच्या वागण्याचा मला राग आला.
15) मंदिरात दगडाची मूर्ती आहे.

# प्रयोग

वाक्य म्हणजे पूर्ण विधान करणारा एक किंवा अनेक शब्दांचा समूह होय. वाक्यातील सर्वात महत्वाचा शब्द म्हणजे क्रियापद होय. त्याशिवाय, कर्ता आणि कर्म देखील तेवढेच महत्वाचे असतात. किंबहुना वाक्यात कर्त्याला किंवा कर्माला प्राधान्य दिल्यामुळे क्रियापदाचे रुप त्याच्याप्रमाणे बदलत असते. त्यामुळे कर्ता-कर्म-क्रियापद हे तीनही घटक महत्वाचे आहेत. वाक्यातील कर्ता-कर्म-क्रियापद यांच्या परस्पर संबंधाला प्रयोग असे म्हणतात.

वाक्यातील क्रियापदाची रचनाच अशी असते की, कधी ते कर्त्याच्या लिंग, वचन किंवा पुरुष याप्रमाणे बदलते, तर कधी कर्माच्या. कधी कधी तर क्रियापद कर्ता किंवा कर्म यांनुसार मुळीच बदलत नाही. कर्त्याची किंवा कर्माची क्रियापदाशी अशी जी जुळणी, ठेवण किंवा रचना असते, तिलाच व्याकरणात प्रयोग असे म्हणतात. वाक्यातील क्रियापद हे कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग, वचन, पुरुष याप्रमाणे बदलते की नाही यावरुन प्रयोगाचे प्रकार पडतात.

## प्रयोगाचे प्रकार :

**प्रयोगाचे मुख्य प्रकार ३ आहेत.**

1) कर्तरिप्रयोग
2) कर्मणिप्रयोग
3) भावेप्रयोग

## 1. कर्तरिप्रयोग :

**वाक्यातील क्रियापद जेव्हा त्यातील कर्त्याच्या लिंग, वचन, पुरुष यानुसार बदलते,** म्हणजेच क्रियापद हे कर्त्याच्या तंत्राप्रमाणे चालते, तेव्हा ते वाक्य कर्तरिप्रयोगात आहे असे म्हणता येईल.

उदा : तो गाणे गातो.

या वाक्यात तो हा कर्ता आहे. गाणे हे कर्म आहे. गातो हे क्रियापद आहे.

या वाक्यातील प्रयोग ओळखण्यासाठी गातो हे क्रियापद कोणाप्रमाणे बदलते, हे पाहाणे आवश्यक आहे. ते कर्त्याप्रमाणे बदलते की कर्माप्रमाणे बदलते, हे सर्वप्रथम लक्षात घ्यावे लागेल. त्यासाठी क्रमाने कर्त्याचे लिंग, वचन व पुरुष बदलून पाहू. असा बदल करताना एकावेळी एकच प्रकारचा बदल करणे आवश्यक आहे,

ती गाणे गाते.
ते गाणे गातात.
तू गाणे गातोस

याचा अर्थ असा की, ती गाणे गाती या वाक्यातील गाती हे क्रियापद कर्त्याचे लिंग, वचन व पुरुष याप्रमाणे बदलले आहे. म्हणजेच येथे क्रियापद हे कर्त्याच्या तंत्राप्रमाणे चालते. म्हणून हा कर्तरिप्रयोग आहे. कर्तरिप्रयोगात कर्ता हा क्रियापदाच्या रुपावर अधिकार चालविणारा असतो.

कर्तरिप्रयोगात क्रियापद सकर्मक असले, तर त्यास **सकर्मक कर्तरिप्रयोग** म्हणतात व क्रियापद अकर्मक असल्यास त्यास **अकर्मक कर्तरिप्रयोग** असे म्हणतात.

उदा :

ती गाणे गाते (सकर्मक कर्तरिप्रयोग)

ती घरी जाते (अकर्मक कर्तरिप्रयोग)

### *कर्तरिप्रयोग कसा ओळखावा ....*

कर्तरिप्रयोगात कर्ता हा नेहमी प्रथमान्तच असतो व कर्म हे प्रथमान्त किंवा द्वितीयान्त असते.

उदा : 1. मी शाळेतून आताच घरी आलो. (कर्ता मी प्रथमान्त)

2. मुलगा पुस्तक वाचतो. ( कर्म पुस्तक प्रथमान्त )

3. त्याने चोरास पकडले (कर्म चोरास द्वितीयान्त)

## 2. कर्मणिप्रयोग :

वाक्यातील क्रियापद जेव्हा त्यातील कर्माच्या लिंग, वचन, पुरुष यानुसार बदलते, म्हणजेच क्रियापद हे कर्माच्या तंत्राप्रमाणे चालते, तेव्हा ते वाक्य कर्मणिप्रयोगात आहे असे म्हणता येईल.

उदा : मुलाने आंबा खाल्ला.

या वाक्यात आंबा हे कर्म आहे. मुलाने हा कर्ता आहे. खाल्ला हे क्रियापद आहे. या वाक्यातील प्रयोग ओळखण्यासाठी खाला हे क्रियापद कोणाप्रमाणे बदलते, हे पाहाणे आवश्यक आहे. ते कर्त्याप्रमाणे बदलते की कर्माप्रमाणे बदलते, हे सर्वप्रथम लक्षात घ्यावे लागेल. त्यासाठी क्रमाने कर्त्याचे लिंग, वचन व पुरुष बदलून पाहू.

मुलीने आंबा खाल्ला.

मुलांनी आंबा खाल्ला.

वरीलप्रमाणे कर्त्याच्या लिंग व वचनामध्ये बदल करुनही क्रियापदाचे रुप खाल्ला यामध्ये बदल होत नाही. म्हणजे कर्त्याच्या लिंगवचनाप्रमाणे क्रियापदाचे रुप बदलत नाही, म्हणून हा कर्तरिप्रयोग नाही..

आता कर्माचे लिंग बदलून पाहू. आंबा ऐवजी चिंच हे स्त्रीलिंगी कर्म घेतले तर क्रियापदाचे रुप खाल्ली असे होईल. कर्माचे वचन बदलून पाहू. आंबा ऐवजी आंबे हे अनेकवचनी रुप घेतले, तर मुलाने आंबे खाल्ले असे वाक्य होईल. म्हणजे क्रियापदाच्या रुपात खाल्ले असा बदल झाला..

याचाच अर्थ असा की, वरील वाक्यात कर्त्याऐवजी कर्माच्या लिंग वचनात बदल झाल्यास क्रियापदाच्या रुपात बदल होतो. म्हणून हा कर्मणिप्रयोग आहे. कर्मणिप्रयोगात क्रियापद कर्माच्या तंत्राप्रमाणे चाले. म्हणजेच कर्म हा धातुरुपेश आहे.

## *कर्मणिप्रयोग कसा ओळखावा ....*

कर्मणिप्रयोगात कर्म प्रथमान्तच असते. कर्ता प्रथमान्त कधीच नसतो. कर्ता कैव्हा तृतीयान्त, चतुर्थ्यन्त, सविकरणी तृतीयान्त किंवा शब्दयोगी अव्ययान्त असतो.

उदा : 1. तिने गाणे म्हटले. ( कर्ता तिने हे तृतीयान्त. कर्म गाणे हे प्रथमान्त)

2. मला हा डोंगर चढवतो.( कर्ता चतुर्थ्यन्त.)

3. रामाच्याने काम करवते. ( कर्ता सविकरणी तृतीयान्त.)

4. मांजराकडून उंदीर मारला गेला.(कर्ता शब्दयोगी अव्ययान्त)

वरील वाक्यांमध्ये प्रयोग कर्मणी असला तरी, त्याचेही विविध प्रकार आहेत.

### अ) प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोग :

या प्रयोगात क्रियापद हे कर्माच्या लिंगवचनानुसार बदलत असले तरी बहुतेक कर्ताच प्रधान असतो. त्यास प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोग असे म्हणतात.

उदा : 1. तिने गाणे म्हटले.

2. मला हा डोंगर चढवतो.

### ब) शक्य कर्मणी प्रयोग :

रामाच्याने काम करवते. या वाक्यात शक्यता सुचविलेली आहे. यातील क्रियापद शक्य क्रियापद आहे. त्यास शक्य कर्मणी प्रयोग असे म्हणतात.

### क) प्राचीन/पुरुष कर्मणी :

प्राचीन मराठी काव्यात सकर्मक धातूला ज हा प्रत्यय लावून करिजे, बोलिजे, कीजे, दईजे अशी कर्मणिप्रयोगाची उदाहरणे दिसतात.

उदा : 1. त्वां काय कर्म करिजे लघु लेकराने

2. नळें इंद्रासी असे बोलिजेले.

3. जो जे कीजे परमार्थ लाहो.

4. द्विजी निषिधापासव म्हणीजेलो.

### ड) समापन कर्मणी :

काही वेळा संयुक्त क्रियापदाने क्रियापदाच्या सताप्तीचा अर्थ सूचित केलेला असतो. अशा प्रकारच्या प्रयोगाला समापन कर्मणी असे म्हणतात. एखादी कृती करून पूर्ण झाली, हे दर्शविण्यासाठी सामान्यत: अशा प्रयोगाची वाक्यरचना केली जाते.

उदा : त्याची गोष्ट लिहून झाली.

या वाक्यात कर्ता त्याची हा षष्ठी विभक्तीत आहे. लिहून झाली या संयुक्त क्रियापदाने समाप्तीचा अर्थ सूचित केलेला आहे.

### इ) नवीन कर्मणी /कर्मकर्तरी :

राम रावणास मारतो

रावण रामाकडून मारला जातो

या दोन्ही वाक्यांचा अर्थ जवळपास सारखाच आहे. पहिल्या वाक्यात मारतो या क्रियापदाचा कर्ता राम असून रावण हे कर्म आहे. दुस-या वाक्यात रावण हा कर्ता आहे. म्हणजे पहिल्या वाक्यातील कर्म दुस-या वाक्यात कर्ता बनले आहे. व मूळच्या वाक्यातील कर्त्याला कडून हे शब्दयोगी अव्यय जोडले आहे. पहिल्या वाक्यात राम या शब्दास प्राधान्य असून त्याचा प्रयोग कर्तरी आहे. दुस-या वाक्यात रावण या शब्दाला म्हणजे मूळ वाक्यातील कर्माला प्राधान्य दिले आहे. मग या वाक्यात कर्मणी प्रयोग आहे, असे निर्विवाद म्हणता येईल का.... नाही. इंग्रजी भाषेतील पॅसिव्ह व्हॉईस च्या प्रभावामुळे मराठीतही आता वरीलप्रमाणे वाक्यरचना होऊ लागली आहे. त्यास कर्मकर्तरी प्रयोग म्हणतात.

कर्मणिप्रयोगातील कर्त्याला कडून हा शब्दयोगी अव्यय लावून इंग्रजी भाषेतील पध्दतीप्रमाणे रचना करण्याचा जो नवीन प्रकार मराठीत रुढ झाला आहे, त्यास नवीन कर्मणी किंवा कर्मकर्तरी असे म्हणतात.

उदा : *शिपायाकडून चोर पकडला गेला.*

यास नवीन कर्मणी असेही म्हणतात. जेव्हा वाक्यातील कर्माला प्राधान्य देऊन विधान करावयाचे असते, किंवा कर्ता स्पष्ट नसतो, किंवा कर्त्याचा उल्लेख टाळायचा असतो, त्यावेळी हा कर्मकर्तरी पयोग सोयीस्कररित्या वापरला जातो.

उदा : 1. गाय गुराख्याकडून बांधली जाते.

2. न्यायाधीशाकडून दंड करण्यात आला

3. सभेत पत्रके वाटली गेली.

4. सर्वांवर कारवाई केली जाईल.

## ३. भावे प्रयोग

जेव्हा क्रियापदाचे रुप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंगवचनानुसार बदलत नसून ते नेहमी तृतीयपुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी असून स्वतंत्र असते, तेव्हा अशा प्रकारच्या वाक्यरचनेस भावे प्रयोग असे म्हणतात.

मुलाने बैलास मारले.

या वाक्यातील कर्त्याच्या आणि कर्माच्याही लिंगवचनात बदल केला, तरी क्रियापदाचे रूप मारले असेच राहते.

भावे प्रयोगात क्रियापदाचा जो भाव किंवा आशय त्याकडे प्राधान्य असते व त्या मानाने कर्ता किंवा कर्म ही दोन्ही गौण असतात.

उदा : 1. रामाने रावणास मारले.
2. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे.
3. त्याने आता घरी जावे.

या वाक्यांपैकी पहिली दोन सकर्मक आहेत, व पुढील वाक्य अकर्मक आहे. भावे प्रयोगाचे सकर्मक भावे प्रयोग व अकर्मक भावे प्रयोग असे दोन प्रकार आहेत.

### भावे प्रयोग कसा ओळखावा ....

- कर्ता तृतीयान्त किंवा चतुर्थ्यन्त असतो.
- कर्म असल्यास त्याची सप्रत्ययी द्वितीया विभक्ती असते.
- अकर्मक भावे प्रयोगात क्रियापद विद्यर्थी असते.
- शक्यार्थक क्रियापदांचा नेहमीच भावे प्रयोग हातो.

### भावकर्तरी प्रयोग :

1. मला आज मळमळते
2. त्याला घरी जाण्यापूर्वी सांजावले.
3. आज सारखे गडगडते.
4. सहलीस जाताना कात्रजजवळ उजाडले.

वरील वाक्यांमध्ये क्रियापदांना कर्ते असे नाहीत.सर्वच वाक्यांतील क्रियापदे तृतीयपुरुषी नपुंसकलिंगी एकवचनी आहेत. म्हणजेच ती भावे प्रयोगी आहेत.पण त्यांना कर्ते नसल्यामुळे हा अकर्तृक भावे प्रयोग होय. अशा वाक्यात क्रियेचा भाव किंवा अर्थ हाच वाक्यातील कर्ता असल्यामुळे यास भावकर्तरी प्रयोग असेही म्हणतात.

## 4. मिश्र किंवा संकर प्रयोग :

मराठीत प्रमुख ३ प्रयोग असले तरी, बोलताना आपण एकाच वाक्यात दोन वेगवेगळे प्रयोग वापरत असतो. त्यावरुन मिश्र किंवा संकर प्रयोग बनलेले आहेत.

### 1) कर्तृ-कर्म संकर :

तू मला पुस्तक दिले (कर्मणिप्रयोग)
तू मला पुस्तक दिलेस (कर्तरी व कर्मणी)

वरील वाक्यांपैकी पहिल्या वाक्यात निर्विवादपणे कर्मणिप्रयोग आहे. दुस-या वाक्यात पुस्तक या कर्माचे पुस्तके असे वचन बदलल्यास दिलीस असे क्रियापद बदलेल. त्यावरुन ती कर्मणिप्रयोग आहे. मात्र तू या कर्त्याचे वचन बदलून तुम्ही घेतल्यास तुम्ही मला पुस्तक दिलेत असे वाक्य होईल. म्हणजे क्रियापद दिलेस हे कर्त्याप्रमाणे देखील बदलते. त्यामुळे याला कर्तरिप्रयोगही म्हणता येईल. त्यामुळेच तू मला पुस्तक दिलेस या वाक्यात कर्तरी व कर्मणी या दोन्ही प्रयोगांच्या छटा आढळतात. म्हणून याला कर्तृ-कर्मसंकर प्रयोग असे म्हणतात.

उदा : 1. तू कविता म्हटलीस
2. तुम्ही कामे केलीत
3. तू लाडू खाल्लास

## 2) कर्म-भाव संकर प्रयोग :

वडिलांनी मुलाला शाळेत घातला (कर्मणिप्रयोग)
वडिलांनी मुलाला शाळेत घातले.(कर्मणि व भावे)

वरीलपैकी पहिल्या वाक्यात कर्ता तृतीयान्त आहे. म्हणून हा कर्तरिप्रयोग नव्हे. मुलाला या कर्माचे लिंग व वचन बदलल्यास मुलीला शाळेत घातली , मुलांना शाळेत घातले अशी रुपे होतील. म्हणजे कर्माप्रमाणे क्रियापदाचे रुप बदलते. म्हणून हा कर्मणि प्रयोग आहे.

दुस-या वाक्यात घातले क्रियापद कर्माच्या लिंग वचनाप्रमाणे बदलते. म्हणून हा देखील कर्मणिप्रयोग आहे. शिवाय कर्ता तृतीयान्त आहे, कर्म द्वितीयान्त आहे व क्रियापद तृतीय पुरुषी नपुंसकलिंगी एकवचन आहे. म्हणजेच भावे प्रयोगाची देखील छटा यात आहे. म्हणून वडिलांनी मुलाला शाळेत घातले या वाक्यात कर्मणी व भावे या दोन्ही प्रयोगाच्या छटा आहेत, म्हणून त्याला कर्म-भाव संकर प्रयोग असे म्हणतात.

उदा : 1. आईने मुलाला निजविले.
2. मी त्याला मुंबईस धाडले.

## 3) कर्तृ-भाव संकर प्रयोग :

तू घरी जायचे होते. (भावे प्रयोग)
तू घरी जायचे होतेस. ( कर्तरी व भावे)

वरीलपैकी पहिल्या वाक्यात तर निर्विवादपणे भावे प्रयोग आहे. पण दुस-या वाक्यात (तू घरी जायचे होतेस) भावे प्रयोगाची व कर्तरी प्रयोगाची देखील छटा आहे. कर्तरी व भावे या दोन प्रयोगांच्या छटा एकत्र आढळतात, म्हणून यास कर्तृ-भाव संकर प्रयोग म्हणतात.

उदा : 1. तू गाईला घालविलेस
2. तू मला वाचविलेलस

# वाक्यसंश्लेषण

**वाक्यांचे प्रकार**

**अर्थानुरीधानुसार**

1) विधानार्थी
2) प्रश्नार्थी
3) उद्गारार्थी
4) हीकारार्थी (करणरुपी)
5) नकारार्थी( अकरणरुपी)

**क्रियापदाच्या रुपावरुन**

1) स्वार्थी
2) आज्ञार्थी
3) विध्यर्थी
4) संकेतार्थी

**वाक्यातील विधानांनुसार**

1)केवलवाक्य
2) मिश्रवाक्य
3) संयुक्तवाक्य

## अर्थारीधानुसार :

**1) विधानार्थी :** ज्या वाक्यात केवळ विधान केलेले असते, त्यास विधानार्थी वाक्य म्हणतात.
उदा : माझे वडील आज परगावी गेले.

**2) प्रश्नार्थी :** ज्या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो, त्यास प्रश्नार्थी वाक्य म्हणतात.
उदा : तू मुंबईस केव्हा जाणार आहेस ?

**3) उद्गारार्थी :** ज्या वाक्यात भावनेचा उद्गार काढलेला असतो, त्यास उद्गारार्थी वाक्य म्हणतात.
उदा : अबब ! केवढी प्रचंड आग ही !

**4)हीकारार्थी (करणरुपी) :** वाक्यातील विधाने हीकारार्थी असल्यास.
उदा : गोविंदा अभ्यास करतो.

**5) नकारार्थी (अकरणरुपी) :** वाक्यातील विधाने नकारार्थी असल्यास.
उदा : गोविंदा मुळीच अभ्यास करत नाही.

## क्रियापदाच्या रुपावरुन :

**1) स्वार्थी :** वाक्यातील क्रियापदाच्या रुपावरुन नुसताच काळाचा बोध होत असेल, तर त्यास स्वार्थी वाक्य म्हणतात.
उदा. मुले घरी गेली, जातात, जातील.

2) **आज्ञार्थी :** वाक्यातील क्रियापदाच्या रुपावरुन आज्ञा, आशीर्वाद, प्रार्थना, विनंती, किंवा उपदेश या गोष्टींचा बोध होत असेल तर त्यास आज्ञार्थी वाक्य म्हणतात.

उदा : मुलांनो, चांगला अभ्यास करा.
परमेश्वरा, मला चांगली बुध्दी दे.
हे देवा, सर्वांना सुखी ठेव.
जा, सुखी राहा.

3) **विध्यर्थी :** वाक्यातील क्रियापदाच्या रुपावरुन विधी म्हणजे कर्तव्य, शक्यता, योग्यता, इच्छा या गोष्टींचा बोध होत असेल तर त्यास विध्यर्थी वाक्य म्हणतात.

उदा : मुलांनी वडिलांची आज्ञा पाळावी.
मला परीक्षेत चांगले गुण मिळावेत.

## वाक्यातील विधानांनुसार :

1) **केवलवाक्य :** वाक्यात एकच विधान, म्हणजे एकच उद्‌देश व एकच विधेय असेल तर त्या वाक्याला शुध्द वाक्य किंवा केवलवाक्य म्हणतात.

उदा : आम्ही जातो आमुच्या गावा
तानाजी लढता लढता मेला.

*केवलवाक्य हे साधे, विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी वा नकारार्थी कोणत्याही प्रकारचे असू शकेल.*

2) **मिश्रवाक्य :** एक प्रधानवाक्य व एक किंवा अधिक गौणवाक्ये गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडून जे एक संमिश्र वाक्य तयार होते, त्यास मिश्र वाक्य असे म्हणतात.

प्रधानवाक्य : अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र असते, त्यास मुख्य किंवा प्रधानवाक्य म्हणतात.

गौणवाक्य : अर्थाच्या दृष्टीने प्रधानवाक्यावर अवलंबून राहणा-या वाक्याला गौणवाक्य किंवा पोटवाक्य म्हणतात.

उदा : जे चकाकते ते सोने नसते.
गुरूजी म्हणाले, की प्रत्येकाने नियमितपणे शाळेत यावे.
आकाशात जेव्हा ढग जमतात, तेव्हा मोर नाचू लागतो.

यातील पहिल्या वाक्यात जे चकाकते हे एक केवलवाक्य आहे व ते सोने नसते हे दुसरे केवलवाक्य आहे. त्यातील जे चकाकते हे अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र वाक्य नाही, ते ते सोने नसतो या स्वतंत्र वाक्यावर अवलंबून आहे.

दुस-या वाक्यात गुरूजी म्हणाले है मुख्य वाक्य असून प्रत्येकाने नियमितपणे शाळेत यावे हे गौणवाक्य की या गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययाने जोडले आहे.

तिस-या वाक्यात आकाशात जेव्हा ढग जमतात हे गौण वाक्य आहे. ते तेव्हा मोर नाचू लागतो या प्रधानवाक्यास जेव्हा या गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययाने जोडलेले आहे.

**३) संयुक्त वाक्य :** दोन किंवा अधिक केवलवाक्ये प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडली असता जे एक जोडवाक्य तयार होते, त्यास संयुक्तवाक्य म्हणतात.

उदा : मी रोज सकाळी पहाटे उठतो व एक तासभर शाळेचा अभ्यास करतो.

सायंकाळी मी क्रीडांगणावर खेळतो किंवा मित्रांबरोबर फिरावयास जातो.

यातील प्रत्येक वाक्यात एकच विधान नसून प्रत्येकात दोन विधाने आहेत. प्रत्येक विधान हे स्वतंत्र केवलवाक्य आहे. पहिल्या वाक्यात दोन स्वतंत्र केवलवाक्ये व या समुच्चयाबोधक उभयान्वयी अव्ययाने जोडली आहेत. दुस-या वाक्यातही दोन स्वतंत्र वाक्ये किंवा या विकल्पबोधक उभयान्वयी अव्ययाने जोडली आहेत. व किंवा ही प्रधानत्वबोधक उभायान्वयी अव्यये आहेत. अशी अव्यये दोन वाक्यांना जोडतात व ही जोडलेली वाक्ये अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र म्हणजे एकमेकांवर अवलंबून नसतात.

संयुक्त वाक्यात दोन किंवा अधिक केवलवाक्येच असतात असे नाही. दोन किंवा अधिक मिश्रवाक्ये प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडली गेली असतील किंवा एक केवलवाक्य मिश्र वाक्याशी प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययाने जोडले गेले असेल तर त्यासही संयुक्त वाक्य म्हणतात.

**संयुक्त वाक्याचे प्रकार ३ :**

1) केवलसंयुक्त (केवल आणि केवल )
2) मिश्रसंयुक्त ( मिश्र आणि मिश्र)
3) केवलमिश्रसंयुक्त (केवल आणि मिश्र)

मिश्रवाक्य व संयुक्त वाक्य यात फरक असा की :

मिश्रवाक्यात एकच वाक्य प्रधान असते. बाकीची सर्व गौण असतात. व ती गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात.

संयुक्त वाक्यात दोन किंवा अधिक प्रधानवाक्ये असतात व ती प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात.

## वाक्यसंश्लेषण किंवा वाक्यसंकलन :

सकाळी आठ वाजण्याचा सुमार असावा. मी बाहेर जाण्याच्या तयारीत होतो. इतक्यात मला तार मिळाली. तारेत लिहिले होते. मुंबईस ताबडतोब निघून या.

या 5 वाक्यांचे एकत्रितपणे एकच वाक्य तयार करा :

सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास मी बाहेर जाण्याच्या तयारीत असताना मला ताबडतोब मुंबईस निघून येण्याबद्दल एक तार आली.

### 1) दोन किंवा अनेक केवलवाक्यांचे एक केवलवाक्य बनविणे :

केवलवाक्यात एकच मुख्य क्रियापद असावे लागते. म्हणजे दिलेल्या वाक्यांपैकी एका वाक्यातील क्रियापद मुख्य ठवून वाक्यांतील क्रियापदांची धातुसाधिते, नामे, विशेषणे किंवा क्रियाविशेषणे आपणास बनवावी लागतात.

अ) तो फरशीवरून चालत होता. त्याचा पाय घसरला.तो पडला.

फरशीवरून चालत असताना पाय घसरून तो पडला.

ब) माझ्या आजीने मला एक डबा पाठविला. त्यात खाण्याचे गोड पदार्थ होते.

माझ्या आजीने मला गोड खाऊचा एक डबा पाठविला.

क) मी चहा पितो. माझ्या वडिलांना ते आवडत नाही.

माझे चहा पिणे माझ्या वडिलांना आडत नाही.

ड) रवीन्द्रनाथ टागोर हे थोर कवी होते. रवीन्द्रनाथांनी गीतांजली हे काव्य लिहिले.

गीतांजलीचे लेखक रवीन्द्रनाथ हे थोर कवी होते.

इ) पुष्कळ वर्षे झाली. मी कॅशियाचे रोप आणले.बागेत एका कोप-यात ते लावले. याची मला मोठी आवड आहे.

पुष्कळ वर्षांपूर्वी मोठ्या आवडीने कॅशियाचे रोप आणून मी ते बागेत एका कोप-यात लावले.

फ) मी नोकरीतून निवृत्त झालो. मला थोडी फुरसत मिळाली. सुताराकडून एक छानदार झोपाळा तयार करवला. त्याची बागेत स्थापना केली.

नोकरीतून निवृत्त झाल्यावर फुरसत मिळताच सुताराकडून एक छानदार झोपाळा तयार करवून घेऊन त्याची मी बागत स्थापना केली.

ग) बाबांनी मला तेथल्या एका माणसाची ओळख करून दिली. त्याने हे कोहळे पिकवले.
एकेक कोहळा किती किलोचा म्हणता ? चाळीस.
चाळीस किलोचा एकेक कोहळा पिकविणा-या तेथल्या एका माणसाची बाबांनी मला ओळख करून दिली.

## 2) दोन किंवा अधिक केवलवाक्यांचे एक संयुक्त वाक्य बनविणे :

दोन किंवा अधिक केवलवाक्यांचे एक संयुक्त वाक्य बनविताना त्यांना जोडणारी योग्य अशीच उभयान्वयी अव्यये वापरावयास हवीत. प्रधानत्वबोधक किंवा गौणत्वबोधक उभयान्वयी अव्ययांचा वापर करावा लागतो. केवळ प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्यय वापरले तर बनणारे वाक्य केवळ-संयुक्त वाक्य होते. प्रधानत्वबोधक व गौणत्वबोधक अशी दोन्ही प्रकारची उभयान्वयी अव्यये वापरल्यास ते मिश्र-संयुक्त वाक्य होते. दोन्ही प्रकारच्या वाक्यांना संयुक्त वाक्यच म्हणतात.

समुच्चयबोधक :

विजा चमकू लागल्या. पावसाला सुरूवात झाली.
विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरूवात झाली.

विकल्पबोधक :

लोक आपली स्तुती करोत.लोक आपली निंदा करोत
लोक आपली स्तुती करोत किंवा निंदा करोत.

न्यूनत्वबोधक :

आपण मरावयास हरकत नाही. आपण कीर्तिरूपाने उरावे.
मरावे परी किर्तीरूपी उरावे.

परिणामबोधक :

वाटेत मोटार नादुरुस्त झाली. मला यावयास उशीर झाला.
वाटेत मोटार नादुरुस्त झाली म्हणून मला यावयास उशीर झाला.

## ३) मिश्र वाक्य बनविणे :

जर दोन वाक्य गौणत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडली असतील तर मिश्रवाक्य तयार होते. गौणत्वबोधक उभयान्वयी अव्यये 4 प्रकारची आहेत.

स्वरुपबोधक :

गुरूजी म्हणाले, पृथ्वी सूर्याभोवती फिरते.
गुरूजी म्हणाले की, पृथ्वी सूर्याभोवती फिरते.

कारणबोधक :

विठ्ठल परीक्षेत उत्तीर्ण झाला.त्याने प्रामाणिकपणे अभ्यास केला.
विठ्ठल परीक्षेत उत्तीर्ण झाला कारण त्याने प्रामाणिकपणे अभ्यास केला.

उद्देशबोधक :

आमचे शरीर सुदृढ व्हावे. आम्ही योगासने करतो.
आमचे शरीर सुदृढ व्हावे म्हणून आम्ही योगासने करतो.

संकेतबोधक :

उद्या सुटी मिळेल. मी तुझ्या घरी येईन.
उद्या सुटी मिळाली तर मी तुझ्या घरी येईन.

केवळ मिश्रवाक्य बनवायचे असल्यास उपयोजिले जाणारे उभयान्वयी अव्यय हे गौणत्वबोधकच असावयास हवे. प्रधानत्वबोधक व गौणत्वबोधक अशी दोन्ही प्रकारची उभयान्वयी अव्यये वापरुन बनविलेल्या वाक्यास मिश्र-संयुक्त वाक्य असे म्हणतात.

<u>सरावासाठी काही वाक्ये :</u>

1) अर्जुनाने फिरत्या मत्स्याच्या डोळ्याचा नेम धरला.
2) अर्जुनाने बाण मारला.

वरील दोन वाक्यांचे एक केवलवाक्य व एक संयुक्त वाक्य करा.

केवल : अर्जुनाने फिरत्या मत्स्याच्या डोळ्याचा नेम धरुन बाण सोडला.
संयुक्त : अर्जुनाने फिरत्या मत्स्याच्या डोळ्याचा नेम धरला आणि बाण सोडला.

1) हे आधुनिक लोकशाहीचे युग आहे.
2) या युगात समाजाने वेळीच जागृत व्हावे.
3) समाजाने आपला योग्य मार्ग सुधारावा.

वरील तीन वाक्यांचे एका केवलवाक्यात रूपांतर करा.

<u>या आधुनिक लोकशाहीच्या युगात समाजाने जागृत होऊन आपला योग्य मार्ग सुधारावा</u>.

1) हा श्रीमंताचा पोर आहे.
2) तो आहे खुळा
3) आमची स्थिती अशीच आहे.

वरील तीन वाक्यांचे केवलवाक्य बनवा.

<u>आमची स्थिती ह्या श्रीमंताच्या खुळ्या पोरासारखी आहे</u>.

1) एकाने माणसे मोजून पाहिली.
2) ती नऊच भरली.

वरील दोन वाक्यांचे केवल, संयुक्त व मिश्र वाक्य तयार करा.

केवल : एकाने माणसे मोजून पाहिल्यावर ती नऊच भरली.
संयुक्त : एकाने माणसे मोजून पाहिली पण ती नऊच भरली.
मिश्र : जेव्हा एकाने माणसे मोजून पाहिली तेव्हा ती नऊच भरली.

सराव :

1) तुम्ही मोरवाडीला जायला निघालात. हे लोक तुम्हांला चोरवाडीला नेऊन पोचवतील.
(मिश्र वाक्य करा)
2) काहीजण शौक म्हणून शिकार करतात. हे अत्यंत असंस्कृत मनाचं लक्षण आहे. अस मला वाटतं.
(केवलवाक्य करा)
3) अंतूशेटने चहाच्या रंगावर शेरा मारला. त्यांनी बशीत चहा ओतून फुर्रफुर्र फुंकायला सुरुवात केली.
(संयुक्त वाक्य करा)
4) साहित्य अकादमीने संत बसवेश्वराचे चरित्र लिहिले आहे.ते तुम्ही वाचा. (केवलवाक्य करा)
5) भोपळे महाराजांनी दोन्ही हात बाजूला पसरविले. विठ्ठलनामाचा पुन्हा गजर सुरु केला. (संयुक्त वाक्य करा)

# काळ

वाक्यातील क्रिया कोणत्या  वेळी घडत आहे, याचा बोध जो होतो, त्याला काळ असे म्हणतात.

**मुख्य काळ तीन आहेत :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) वर्तमानकाळ | : अ) अपूर्ण | ब) पूर्ण | क) साधा | ड)रीति |
| 2) भूतकाळ | : अ) अपूर्ण | ब) पूर्ण | क) रीति | ड)रीति |
| 3) भविष्यकाळ | : अ) अपूर्ण | ब) पूर्ण | क) रीति | ड)रीति |

## अपूर्ण काळ

वाक्यातील क्रियेची अपूर्णता दाखवण्यासाठी अपूर्ण काळ वापरतात. अपूर्ण काळात क्रियापदाची रूपे बनवताना क्रिया अपुरी दर्शविणारे धातुसाधित व त्यापुढे  अस  या सहायक क्रियापदाची त्या त्या काळातील रूपे येतात.

उदा :  तो मुलगा खेळ.

या शब्दांपासून अपूर्ण काळातील वाक्ये बनवा.

तो मुलगा खेळत  आहे. ( अपूर्ण वर्तमानकाळ)

तो मुलगा खेळत होता. ( अपूर्ण भूतकाळ)

तो मुलगा खेळत असेल.(अपूर्ण भविष्यकाळ)

## पूर्ण काळ

वाक्यातील क्रियेचे पूर्णत्व दर्शविण्यासाठी  पूर्ण काळ वापरतात. पूर्ण काळात क्रियापदाची रूपे बनवताना क्रियेचे पूर्णत्व दर्शविणारे धातुसाधित व त्यापुढे अस या सहायक क्रियापदाची त्या त्या काळातील रूपे येतात.

उदा : मधू लाड खा.

या शब्दांपासून अपूर्ण काळातील वाक्ये बनवा.

उदा :  मधूने लाडू खाल्ला आहे. (पूर्ण वर्तमानकाळ)

मधूने लाडू खाल्ला होता. (पूर्ण भूतकाळ)

मधूने लाडू खाल्ला असेल. (पूर्ण भविष्यकाळ)

## साधा काळ आणि रीतिकाळ

एखादी क्रिया सतत घडत असल्याचे  दर्शविण्यासाठी तीनही काळात ती क्रिया सतत घडत असल्याचे दर्शविणारे क्रियापद वापरले तर साधा काळ होतो  आणि तीच क्रिया दर्शविण्यासाठी संयुक्त क्रियापद वापरल्यास  रीति काळ होतो.

उदा :  मुलगा पुस्तक वाचतो (साधा वर्तमानकाळ)

मुलगा पुस्तक वाचत असतो. (रीति वर्तमानकाळ)
मुलगा पुस्तक वाचायचा (साधा भूतकाळ)
मुलगा पुस्तक वाचत असे (रीति भूतकाळ)
मुलगा पुस्तक वाचेल (साधा भविष्यकाळ)
मुलगा पुस्तक वाचत जाईल (रीति भविष्यकाळ)

## काळांचे विशेष उपयोग :

भाषेचा व्यवहार करताना काळाचे बंधन काटेकोरपणे पाळले जात नाही. एखाद्या काळाचा वापर दुस-याच काळातील क्रियेबद्दल केलेला आढळून येतो. शिवाय, त्यातही विविध सूक्ष्म छटा आढळतात. भाषेचा अभ्यास करताना काळाचे हे विशेष उपयोग पाहूया :

### वर्तमानकाळ :

सर्व काळी व सर्वत्र सत्य असलेले विधान करताना म्हणजेच त्रिकालाबाधित सत्य सांगताना साधा वर्तमानकाळ वापरतात.

उदा : सूर्य पूर्वेस उगवतो.
पृथ्वी सूर्याभोवती फिरते.

भूतकाळातील घटना सांगताना काही वेळा वर्तमानकालीन क्रियापदे वापरतात. अशा काळाला ऐतिहासिक वर्तमानकाळ म्हणतात.

उदा : अर्जुन श्रीकृष्णास म्हणतो (म्हणजेच म्हणाला होता)

लवकरच सुरु होणारी क्रिया दर्शविताना काही वेळा वर्तमानकालीन क्रियापदे वापरतात. यामध्ये संनिहित भविष्यकाळ असतो.

उदा : तुम्ही पुढे व्हा, मी येतोच (म्हणजे मी येईन)

भूतकाळात काढलेले उद्‌द्गार दर्शविताना ती वर्तमानकाळात अवतरणचिन्हे वापरुन लिहण्याची पद्धत आहे.

उदा : समर्थ रामदास म्हणतात "जगी सर्व सुखी असा कोण आहे ?"

लगतचा भूतकाळ सांगताना काही वेळा वर्तमानकाळ वापरला जातो.

उदा : मी बसतो (बसलो होतो) तोच तुम्ही हजर !

**भूतकाळ :**

ताबडतोब घडणार असलेली क्रिया दर्शविण्यासाठी काही वेळा क्रियापदाचे भूतकाळी रूप वापरतात. यामध्ये संनिहित भविष्यकाळ असतो.

उदा : तुम्ही पुढे व्हा, मी आलोच (येईन)

एखादी क्रिया भविष्यकाळात खात्रीने होणार, या अर्थी कधी कधी भूतकाळी रूपे वापरतात. अशा वाक्याला नि:संशय भविष्यकाळ म्हणतात.

उदा : जवळ ये की मार बसलाच म्हणून समज (खात्री)

संकेत व्यक्त करायचा असल्यास काही वेळा क्रियापदाचे भूतकाळी रूप वापरतात.

उदा: पाऊस आला (येईल) तर ठीक

वर्तमानकाळातील अपूर्ण क्रिया संपण्याच्या बेतात आहे, अशा अर्थी.

उदा : तो बघ, तुझा मित्र आला.

**भविष्यकाळ :**

काही वेळा संकेत व्यक्त करायचा असल्यास क्रियापदाचे भविष्यकाळी रूपही वापरतात.

उदा : तू मदत देशील तर मी आभारी होईन

काही वेळा अशक्यता दर्शविताना क्रियापदाचे भविष्यकाळी रूप वापरतात.

उदा : सगळेच मूर्ख कसे असतील ? (अशक्यता)

काही वेळा संभावना व्यक्त करतानादेखील भविष्यकाळ वापरतात

उदा : गुरूजी आत शाळेत असतील. (असण्याचा संभव)

काही वेळा इच्छा व्यक्त करताना क्रियापदाचे भविष्यकाळी रूप वापरतात

उदा : मला दोन रुपये हवे होते (आहेत).

**स्वाध्याय :**

1) मी अभ्यास करतो (रीति भूतकाळ करा)

मी अभ्यास करत असायचो./करी.

2) मी खो-खो खेळतो. (रीति वर्तमानकाळ करा)

मी खो-खो खेळत असतो.

3) रस्त्याने डाव्या बाजूने चालावे (रीति वर्तमानकाळ करा)

रस्त्याने डाव्या बाजूने चालत जावे.

4) मी संगीत ऐकतो (रीति भविष्यकाळ करा)

मी संगीत ऐकत राहीन

5) मुलांनो, आपल्या शिक्षकांचे ऐका (विध्यर्थ करा)

मुलांनी आपल्या शिक्षकांचे ऐकावे.

6) मी राज्याचा मुख्यमंत्री झालो तर ! (उद्गारार्थी वाक्याचे विधानार्थी वाक्य करा)

मला राज्याचा मुख्यमंत्री होण्याची फार इच्छा आहे.

7) ही काही वाईट कल्पना नाही. ( होकारार्थी  वाक्य करा)

ही कल्पना ब-यापैकी आहे.

8) मी  चहा घेतला.( कर्मकर्तरी करा)

माझ्याकडून चहा घेतला गेला)

9) जेव्हा शाळेची घंटा झाली तेव्हा मी वर्गात जाऊन पोचलो होतो. (गौण वाक्याचे प्रधान वाक्यात रूपांतर  करून लिहा)

जेव्हा मी वर्गात जाऊन पोचलो होतो तेव्हा शाळेची घंटा अद्याप व्हावयाची होती.

10) जे जे चकाकते ते ते सोने नसते  (प्रधान वाक्याचे गौण वाक्यात रूपांतर करून लिहा)

जे जे सोने नसते ते देखील केव्हा केव्हा चमकते.

11) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काय केले नाही ? (प्रश्नार्थक वाक्याचे नकारार्थी वाक्य तयार करा)

शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काही करायचे बाकी ठेवले ना

# शब्दशक्ती :

शब्दांमध्ये अनेक अर्थ प्रकट करण्याचे सामर्थ्य असते. कधी थेट अर्थ असतो, तर कधी गर्भित अर्थ असतो. एकच शब्द अनेक अर्थांनी वापरता येतो. प्रत्येक शब्दामध्ये प्रकट करण्याची अंगभूत शक्ती असते. ही शब्दशक्ती वापर करणा-यास अचूक माहिती हवी. शब्दांच्या अंगी तीन प्रकारची शक्ती असते.

1) अभिधा
2) लक्षणा
3) व्यंजना

**अभिधा :** शब्दातून किंवा वाक्यातून जेव्हा सरळसरळ, किंवा शब्दश: अर्थ प्रकट होत असतो, तेव्हा त्या शब्दशक्तीला अभिधा म्हणतात. या अभिधा शक्तीच्या साहाय्याने प्रगट होणारा जो अर्थ असतो, त्यास वाच्यार्थ म्हणतात.

उदा : त्या जंगलात खूप साप आहेत.

या वाक्यातील जंगल हा शब्द ऐकताच आपण वन, झाडांची जास्त संख्या असलेली जागा असा अर्थ घेतो. साप हा शब्द वाचल्याबरोबर एक सरपटणारा प्राणी एवढे आपल्याला कळते. हा अर्थ व्यक्त कण्याची या शब्दातली ही जी शक्ती असते, तिला अभिधा असे म्हणतात. या अभिधाशक्तीच्या साहायाने प्रगट होणारा जो अर्थ आहे, त्यास वाच्यार्थ म्हणतात.

**व्यंजना :**

शब्दातून किंवा वाक्यातून सरळसरळ अर्थ प्रगट न होता, व्यंगात्मक अर्थ प्रतीत होत असतो, तेव्हा त्या शब्दशक्तीला व्यंजना असे म्हणतात. या शक्तीच्या सहाय्याने प्रगट होणारा जो अर्थ असतो, त्यास व्यंगार्थ म्हणतात.

उदा : **समाजात वावरणारे असले साप ठेचूनच काढले पाहिजेत.**

या वाक्यातून केवळ वाच्यार्थ अभिप्रेत नाही. साप या शब्दातून दुष्ट माणसे असा अर्थ ध्वनित होतो. म्हणजे मूळ अर्थाला बाध न आणता दुसरा अर्थ व्यक्त करण्याची शब्दाची जी शक्ती आहे, तिला व्यंजना शक्ती असे म्हणतात. या शक्तीने प्रकट होणा-या अर्थाला व्यंगार्थ असे म्हणतात.

**बारा वाजले.**

या वाक्याचा वाच्यार्थ म्हणजे घड्याळाने बारा वाजल्याचे दर्शविले. पण या वाक्यावरून निरनिराळ्या व्यक्तींना निरनिराळे अर्थ कळतात. कोणाला वाटेल की, क्लास सुटण्याची वेळ झाली,

कुणाला वाटेल की, वाईट झाले, कोणाला वाटेल की कामावर जायची वेळ झाली. वगैरे. म्हणजे मूळ अर्थ तसाच राहून त्यातून जो दूसरा अर्थ सूचित होतो, त्यास व्यंगार्थ म्हणतात.

**लक्षणा :**

आपल्या नेहमीच्या बोलण्यात असे काही शब्द वा वाक्ये येतात, की त्यांचा शब्दश: अर्थ घेतला तर भलताच अर्थ निर्माण होतो. अशा वेळी शब्दश: अर्थ न घेता, त्याच्याशी सुसंगत असलेला असा दूसराच अर्थ घ्यावा लागतो.

उदा : 1) चला ताटावर बसा. या ठिकाणी ताटावर याचा शब्दश: अर्थ घेतला तर अनर्थ होईल. मग यात असा अर्थ आहे की, ताटाशेजारी.

2) आम्ही गहू खातो. या ठिकाणी गहू हे धान्य असा न करता गव्हापासून तयार केलेले पदार्थ असाच करायला हवा. म्हणजे मूळ अर्थाला बाध येत असेल तर त्याला जुळेलसा दूसरा अर्थ घ्यावा लागतो. (म्हणजे मुख्यार्थबाध ) या शब्दाच्या शक्तीस लक्षणा शक्ती असे म्हणतात व या शक्तीमुळे प्रगट होणा-या अर्थास लक्षार्थ असे म्हणतात.

3) काल आमच्या घरावरुन हत्ती गेला.

4) अंगात शर्ट घाला

5) पायात चप्पल घाला.

# संधी

जोडशब्द तयार करताना पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुस-या शब्दातील पहिला वर्ण हे एकमेकांमध्ये मिसळतात व त्या दोहोंबद्दल एक वर्ण तयार होतो. वर्णाच्या अशा एकत्र होण्याच्या प्रकारास संधी असे म्हणतात. संधी म्हणजे सांधणे, जोडणे.

**संधीचे प्रकार**

1) **स्वरसंधी**
2) **व्यंजनसंधी**
3) **विसर्गसंधा**

**स्वरसंधी :**

एकमेकांशेजारी येणारे वर्ण हे जर स्वरांनी जोडलेले असतील तर त्यांना स्वरसंधी असे म्हणतात. स्वर + स्वर असे त्यांचे स्वरुप असते.

उदा : सूर्य + सूर्य = (अ + अ = आ) सूर्यास्त

## स्वरसंधीचे प्रकार :

### अ) सजातीय स्वरसंधी :

-हस्व स्वरापुढे किंवा दीर्घ स्वरापुढे तोच स्वर -हस्व किंवा दीर्घ आल्यास म्हणजेच दोन सजातीय स्वर लागोपाठ आल्यास त्या दोहोंबद्दल त्याच जातीतील एकच दीर्घ स्वर होतो. यालाच **सजातीय स्वरसंधी** असे म्हणतात.

उदा :

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| सूर्य + अस्त | अ + अ = आ | सूर्यास्त |
| देव + आलय | अ + आ = आ | देवालय |
| विद्या + अर्थी | आ + अ = आ | विद्यार्थी |
| महिला + आश्रम | आ + आ = आ | महिलाश्रम |
| मुनि + इच्छा | इ + ई = ई | मुनीच्छा |
| गिरि + ईश | इ + ई = ई | गिरीश |
| मही + ईश | ई + ई = ई | महीश |
| गुरु + उपदेश | उ + उ = ऊ | गुरुपदेश |
| भू + उद्धार | ऊ + उ = ऊ | भूद्धार |

### ब) गुणादेश स्वरसंधी :

**अ** किंवा **आ** यांच्यापुढे **इ** किंवा **ई** आल्यास त्या दोहोंऐवजी **ए** येतो

**अ** किंवा **आ** यांच्यापुढे **उ** किंवा **ऊ** आल्यास **ओ** येतो, आणि

**अ** किंवा **आ** यांच्यापुढे **ऋ** आल्यास **त्या** दोहोंऐवजी **अर्** येतो.

**उदा :**

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| ईश्वर + इच्छा | अ + इ = ए | ईश्वरेच्छा |
| गण + ईश | अ + ई = ए | गणेश |
| उमा + ईश | आ + ई = ए | उमेश |
| चंद्र + उदय | अ + उ = ओ | चंद्रोदय |
| महा + उत्सव | आ + उ = ओ | महोत्सव |
| देव + ऋषी | अ + ऋ = अर् | देवर्षी |
| महा + ऋषी | आ + ऋ = अर् | महर्षी |

### क) वृद्ध्यादेश स्वरसंधी :

**अ** किंवा **आ** यांच्यापुढे **ए** किंवा **ऐ** हे स्वर आल्यास त्या दोहोबद्दल ऐ येतो आणि **अ** किंवा **आ** या स्वरापुढे **ओ** किंवा **औ** हे स्वर आल्यास त्या दोहोंबद्दल **औ** हा स्वर येतो. याला **वृद्ध्यादेश** असे म्हणतात.

**उदा :**

| **पोटशब्द** | **एकत्र येणारे स्वर व संधी** | **जोडशब्द** |
|---|---|---|
| **एक + एक** | अ + अ = ऐ | **एकैक** |
| **मत + ऐक्य** | अ + ऐ = ऐ | **मतैक्य** |
| **सदा + एव** | आ + ए = ऐ | **सदैव** |
| **प्रजा + ऐक्य** | आ + ऐ = ऐ | **प्रजैक्य** |
| **जल + ओघ** | अ + ओ = औ | **जलौघ** |
| **गंगा + ओघ** | आ + ओ = औ | **गंगौघ** |
| **वृक्ष + औदार्य** | अ + औ = औ | **वृक्षौदार्य** |

### ड) यणादेश स्वरसंधी :

**इ, उ, ऋ** (-हस्व किंवा दीर्घ) यांच्यापुढे विजातीय स्वर आल्यास :

**इ-ई** बद्दल **य** हा वर्ण येऊन पुढील स्वर त्यात मिसळतो.

**उ-ऊ** बद्दल **व** हा वर्ण येऊन पुढील स्वर त्यात मिसळतो आणि

**ऋ** बद्दल **र** हा वर्ण येऊन त्यात पुढील स्वर मिसळतो व संधी होतो.

***य, व, र यांच्याबद्दल अनुक्रमे इ, उ, ऋ आल्यास संप्रसारण म्हणतात.***

**उदा :**

| **पोटशब्द** | **एकत्र येणारे स्वर व संधी** | **जोडशब्द** |
|---|---|---|
| **प्रीती + अर्थ** | इ+ अ = य् + अ = य | **प्रीत्यर्थ** |
| **इति + आदि** | इ + आ = य् + आ = या | **इत्यादि** |
| **अति + उत्तम** | इ + उ = य् + उ = यु | **अत्युत्तम** |
| **प्रति + एक** | इ + ए = य् + ए = ये | **प्रत्येक** |
| **मनु + अंतर** | उ + अ = व् + अ = व | **मन्वंतर** |
| **सु + अल्प** | उ + अ = व् + अ = व | **स्वल्प** |
| **पितृ + आज्ञा** | ऋ + आ = र् + आ = रा | **पित्राज्ञा** |

इ) उर्वरित स्वरसंधी :

ए, ऐ, ओ, औ या स्वरांपुढे कोणताही स्वर आला तर त्यांबद्दल अनुक्रमे अय, आय, अवी, आवि असे आदेश होऊन पुढील स्वर त्यात मिसळती.

उदा :

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| ने + अन | ए + अ = अय् + अ = अय | नयन |
| गै + अन | ऐ + अ = आय् + अ = आय | गायन |
| गो + ईश्वर | ओ + ई = अव् + ई = अवी | गवीश्वर |
| नौ +इक | औ + ई = आव् + इ = आवि | नाविक |

पुढील शब्दांचे संधी करा व ते ज्या नियमांनुसार झाले आहेत, ते नियम सांगा

राष्ट्र + इतिहास

राष्ट्रेतिहास : गुणादेश

स्वभाव + उक्ती

स्वभावोक्ती : गुणादेश

महा + ईश

महेश : गुणादेश

गुरु + आज्ञा

गुरवाज्ञा : यणादेश

क्षण + एक

क्षणैक : वृद्ध्यादेश

राजा + आज्ञा

राजाज्ञा : सजातीय

रमा + ईश

रमेश : गुणादेश

पुढील संधी सोडवा

दु:खार्त

दु:ख + आर्त : सजातीय

गणेशोत्सव

गणेश + उत्सव : गुणादेश

गुर्वाज्ञा

गुरु + आज्ञा : यणादेश

सहोदर

सह + उदर : गुणादेश

लंकेश्वर

लका + ईश्वर : गुणादेश

अन्वेषण

अनु + अषण : यणादेश

कुंभार

कुंभ + आर : सजातीय

दैवैश्वर्य

देव + ऐश्वर्य :वृद्ध्यादेश

धारोष्ण

धारा + उष्ण : गुणादेश

गुर्वैश्वर्य

गुरु + ऐश्वर्य : वृद्ध्यादेश

भानूदय

भानू + उदय : सजातीय

हेत्वाभास

हेतू + आभास : यणादेश

सुरेश्वर

सुर + ईश्वर : गुणादेश

गौर्यानंद

गौरी + आनंद : यणादेश

सुरासुर

सुर + असुर : सजातीय

भवौषधी

भव + औषधी : वृद्ध्यादेश

रंगेल

रंग + ईल : गुणादेश

गंगोर्मी

गंगा + ऊर्मी : गुणादेशदु:ख + आर्त

विद्यैश्वर्य विद्या + ऐश्वर्य : वृद्ध्यादेश

## 2. व्यंजनसंधी

जोडाक्षर होताना जवळ जवळ येणा-या दोन वर्णांपैकी दोन्ही व्यंजने असतील किंवा पहिला वर्ण व्यंजन व दुसरा वर्ण स्वर असेल, तेव्हा त्याला व्यंजनसंधी असे म्हणतात. व्यंजन + व्यंजन किंवा व्यंजन + स्वर असे त्याचे स्वरुप असते.

### अ) प्रथम व्यंजन संधी :

पहिल्या पाच वर्गांपैकी अनुनासिकाशिवाय कोणत्याही व्यंजनापुढे कठोर व्यंजन आले असता त्या पहिल्या व्यंजनाच्या जागी त्याच्याच वर्गातील पहिले कठोर व्यंजन येऊन संधी होतो. याला प्रथम व्यंजन संधी म्हणतात.

उदा :

| पोटशब्द | एकत्र येणारी व्यंजने व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| विपद् + काल | द् + क् = त् + क् = त्क | विपत्काल |
| वाग् + पती | ग् + प् = क् + प् = क्प | वाक्पती |
| वाग् + ताडन | ग् + त् = क् + त् = क्त | वाक्ताडन |
| षड् + शास्त्र | ड् + श् = ट् + श् = ट्श | षट्शास्त्र |
| क्षुध् + पिपासा | ध् + प् = त् +प् = त्प | क्षुत्पिपासा |

### ब) तृतीय व्यंजन संधी :

पहिल्या पाच वर्गातील कठोर व्यंजनापुढे अनुनासिकाखेरीज स्वर किंवा मृदू व्यंजन आल्यास त्याच्या जागी त्याच वर्गातील तिसरे व्यंजन येऊन संधी होतो. याला तृतीय व्यंजन संधी म्हणतात.

उदा :

| पोटशब्द | एकत्र येणारी व्यंजने व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| वाक् + ईश्वरी | क् +ई = ग् + ई = गी | वागीश्वरी |
| वाक् + विहार | क् + व् = ग् + व = ग्व | वाग्विहार |
| षट् + रिपू | ट् + र् = ड् + र = ड्र | षड्रिपू |
| सत् + आचार | त् + आ = द् +Xा = दा | सदाचार |
| अच् + आदी | च् +Xा = ज् + आ = जा | आजादी |
| अप् + ज | प् + ज् = ब् +ज् = ब्ज | अब्ज |

## क) अनुनासिक संधी :

पहिल्या पाच वर्गातील कोणत्याही व्यंजनापुढे अनुनासिक आल्यास पहिल्या व्यंजनाबद्दल त्याच्याच वर्गातील अनुनासिक व्यंजन येऊन संधी होतो, याला अनुनासिक संधी म्हणतात.

उदा :

| पोटशब्द | एकत्र येणारी व्यंजने व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| वाक् +निश्चय | क् + न् = ङ् + न् | वाङ्निश्चय |
| षट् +मास | ट् +म् = ण् +म् | षण्मास |
| जगत् + नाथ | त् + न् = न् + न् | जगन्नाथ |
| सत् + मती | त् + म् = न् +म् | सन्मती |

## ड) त व्यंजन संधी :

त् या व्यंजनापुढे :

च् छ् आल्यास त् बद्दल **च्** होतो.
ज् झ् आल्यास त् बद्दल **ज्** होतो.
ट् ठ् आल्यास त् बद्दल **ट्** होतो.
ल् आल्यास त् बद्दल **ल्** होतो.
श् आल्यास त् बद्दल च् होतो व **श्** बद्दल **छ्** होतो.

उदा :

| पोटशब्द | एकत्र येणारी व्यंजने व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| सत् +चरित्र | त् + च = च् + च् | सच्चरित्र |
| उत् + छेद | त् + छ् = च् +छ् | उच्छेद |
| सत् + जन | त् + ज = ज् + ज् | सज्जन |
| तत् + टीका | त् + ट् = ट् + ट् | तट्टीका |
| उत् + लंघन | त् + ल् = ल् + ल् | उल्लंघन |
| सत् +शिष्य | त् + श = च् + छ् | सच्छिष्य |

इ) म् पुढे स्वर आल्यास तो स्वर मागील म् मध्ये मिसळून जातो. व्यंजन आल्यास म् बद्दल मागील अक्षरावर अनुस्वार किंवा बिंदू येतो.

उदा : सम् + आचार = समाचार
सम् + गती = संगती

फ) छ् पूर्वी -हस्व स्वर आल्यास त्या दोहोंमध्ये च् हा वर्ण येतो.

उदा : रत्न + छाया = रत्नच्छाया

शब्द + छल = शब्दच्छल

पुढील शब्दांचे संधी करा व ते ज्या नियमांनुसार झाले आहेत, ते नियम सांगा

दिक् + विजय

**दिग्विजय** : तृतीय व्यंजन

पृथक् + करण

**पृथक्करण** : प्रथम व्यंजन

क्षुध् + तृषा

**क्षुत्तृषा** : प्रथम व्यंजन

तत् + मय

**तन्मय** : अनुनासिक संधी

भगवत् +लीला

**भगवल्लीला** : त नियम संधी

तत् + चरित्र

**तच्चरित्र** : त नियम संधी

पुढील संधी सोडवा व ते कोणत्या नियमांनी तयार झाले आहे, ते सांगा.

मच्छर

**मत् + शर** : त नियम संधी

उच्छृंखल

**उत् + शृंखल** : त नियम संधी

सच्चिदानंद

**सत् + चित् + आनंद** : त नियम आणि तृतीय व्यंजन

परीक्षा

**परि + ईक्षा** : सजातीय स्वरसंधी

प्रत्यक्ष

**प्रति + अक्ष** : गुणादेश

सद्भावना

**सत् + भावना** : तृतीय व्यंजन संधी दिङ्मूढ **दिक् + मूढ** : अनुनासिक संधी

## विसर्गसंधी

विसर्ग हे स्वरादी आहेत. विसर्ग कोणत्या तरी स्वरानंतर येतात. विसर्गसंधीमध्ये एकत्र येणाऱ्या वर्णांतील पहिला वर्ण विसर्ग व दुसरा वर्ण व्यंजन किंवा स्वर असतो, तेव्हा त्याला विसर्गसंधी असे म्हणतात. उदा : मन: + रंजन = मनोरंजन

न: + रं = न् + अ + विसर्ग + र + अ + अनुस्वार

म्हणजेच विसर्ग + र् असे वर्ण येथे एकत्र आले व मनोरंजन असा जोडशब्द तयार झाला आहे.

### 1) विसर्ग-उकार संधी :

विसर्गाच्या मागे **अ** हा स्वर असून पुढे मृदू व्यंजन आल्यास विसर्गाचा **उ** होतो व तो मागील **अ** मध्ये मिसळून त्याचा **ओ** होतो.

| **पोटशब्द** | **एकत्र येणारे स्वर, विसर्ग व संधी** | **जोडशब्द** |
|---|---|---|
| यश : + धन | श् + अ + विसर्ग + धन = श् + ओ + धन | यशोधन |
| मन: + रंजन | न् + अ +विसर्ग + रंजन = न् + ओ + रंजन | मनोरंजन |
| अध: + वदन | ध् + अ + विसर्ग + वदन = ध् + ओ + वदन | अधोवदन |
| तेज: + निधी | ज् + अ + विसर्ग + निधी = ज् + ओ + निधी | तेजोनिधी |

### 2) विसर्ग-र्- संधी :

विसर्गाच्या मागे **अ, आ** खेरीज कोणताही स्वर असून पुढे मृदू वर्ण आल्यास विसर्गाचा **र्** होऊन संधी होतो. या संधीच्या प्रकाराला विसर्ग-र-संधी असे म्हणतात.

| पोटशब्द | एकत्र येणारे स्वर, विसर्ग व संधी | जोडशब्द |
|---|---|---|
| नि: + अंतर | नि + विसर्ग + अं = (नि)रं | निरंतर |
| दु: + जन | दु + विसर्ग + जन = (दुर्)ज | दुर्जन |
| बहि: + अंग | हि + विसर्ग + अं = (हि)रं | बहिरंग |

**र्** च्या पुढे **र** हा वर्ण आल्यास **र** चा लोप होतो व त्यामागील स्वर -हस्व असल्यास दीर्घ होतो.

उदा :

नि: + रस = नि + र् + रस = नीरस

नि: + रव = नि + र् + रव = नीरव

येथे मागील नियमाप्रमाणे विसर्गाचा **र्** झाला पण अशा **र्** च्या पुढे **र** हा वर्ण आल्यामुळे यातील **र्** चा लोप होऊन त्याचा **नि** दीर्घ झाला आहे.

3) पदाच्या शेवटी **स** येऊन त्याच्यापुढे कोणतेही व्यंजन आल्यास **स्** चा विसर्ग होतो.

उदा : मनस् + पटल = मन:पटल

तेजस् + कण = तेज:कण

4) पदाच्या शेवटी **र** येऊन त्याच्यापुढे कठोर व्यंजन आल्यास त्या **र** चा विसर्ग होतो.

उदा :अंतर् + करण = अंत:करण

चतुर् + सूत्री = चतु:सूत्री

5) विसर्गाच्या ऐवजी येणा-या **र्** च्या मागे **अ** व पुढे मृदू वर्ण आल्यास तो **र्** तसाच राहून संधी होतो.

उदा : पुनर् + जन्म = पुनर्जन्म

अंतर् + आत्मा = अंतरात्मा

6) विसर्गाच्या मागे **अ** हा स्वर असून पुढे **क्, ख् , प्, फ्** यापैकी एखादे व्यंजन आले तर विसर्ग कायम राहतो. मात्र पुढे अन्य स्वर आला तर विसर्ग लोप पावतो.

प्रात: + काल = प्रात:काल

तेज: + पुंज = तेज:पुंज

इत: + उत्तर = इतउत्तर

अत: + एव = अतएव / ✗तैव

7) विसर्गाच्या मागे **इ** किंवा **उ** असून पुढे **क् , ख् , प् , फ्** यापैकी कोणताही वर्ण आल्यास विसर्गाचा **ष्** होतो.

उदा : नि: + कारण = निष्कारण

नि: + पाप = निष्पाप

दु: + परिणाम = दुष्परिणाम

दु: + कृत्य = दुष्कृत्य

(दु:ख आणि नि:पक्ष हे अपवाद आहेत)

8) विसर्गाच्या पुढे **च् , छ्,** आल्यास विसर्गाचा **श्** होतो आणि **त् , थ्** आल्यास विसर्गाचा **स** होतो.

उदा : नि: + चल = निश्चल

दु: + चिन्ह = दुश्चिन्ह

मन: + ताप = मनस्ताप

नि: + तेज = निस्तेज

९) विसर्गाच्या पुढे **श्, स्** आल्यास विसर्ग विकल्पाने कायम राहतो. किंवा लोप पावतो.

उदा : दु: + शासन = दु:शासन (दुश्शासन)

नि: + संदेह = नि:संदेह (निस्संदेह)

चतु: + शृंगी = चतु:शृंगी (चतुश्शृंगी)

पुर: +=सर = पुर:सर (पुरस्सर)

## मराठीचे विशेष संधी :

### 1) पूर्वरुप संधी :

मराठीत केव्हा केव्हा दोन स्वर एकापुढे एक आले असता त्यांतील पहिला स्वर (पूर्व स्वर) न बदलता तसाच राहतो व दुसरा स्वर लोप पावतो.

उदा : काही + असा = काहीसा

खिडकी + आत = खिडकीत

केले + असे = केलेसे

किती + एक = कित्येक

### 2) पररुप संधी :

केव्हा केव्हा मराठी शब्दांचा संधी होताना पहिल्या पदातील शेवटचा स्वर लोप पावतो व दुसरा स्वर (पर स्वर) कायम राहून संधी होतो. याला पररुप संधी असे म्हणतात.

उदा : घर + ई = घरी

एक + एक = एकेक

कर + उन = करुन

३) दीर्घ स्वरापुढे येणा-या स्वराचा मागील स्वराशी सामान्यत: संधी होत नाही.

उदा : जा + ऊन = जाऊन

हो + ऊन = होऊन

घे + ईल = घेईल

4) ही या शब्दयोगी अव्ययाचा संख्याविशेषणाशी दोन प्रकारांनी संधी होतो.

अ) ह चा लोप न पावता : दोन + ही = दोन्ही (तिन्ही, चा-ही)

ब) ह चा लोप होऊन : दोन + ही = दोनी (तिनी, चारी)

5) अनुरुप, अनुस्वार यांसारखे शब्द जोडताना मागील शब्दाचे सामान्यरुप होऊन मग पूर्वरुप संधी होतो.उदा : गरज + अनुरुप = गरजेनुरुप पद्धती + अनुसार = पद्धतीनुसार

## 6) बोली भाषेतील संधी :

बोलण्याच्या ओघात मराठीत काही शब्द एकमेकांत मिसळून नवीन रूपे तयार होतात.

उदा : येतो + आहे = येतोहे, येतोय

गेली + आहे = गेलीहे, गेलीय

करतो + आहे = करतोहे, करतोय

चालली + आहे = चाललीहे, चाललीय

## पुढील शब्दांचा संधी करा

दु: + कर = दुष्कर

बहि: + कार = बहिष्कार

धनु: + वात = धनुर्वात

आयु: + वेद = आयुर्वेद

पुन: + आगमन = पुनरागमन


अध: + तल = अधस्तल

## पुढील संधी सोडवा .

| | |
|---|---|
| मोठेसे | मोठे + असे = मोठेसे |
| पुनरुच्चार | पुन: + उच्चार = पुनरुच्चार |
| दारी | दार + ई = दारी |
| अंतर्गत | अंत: + गत = अंतर्गत |
| शनैश्चर | शनि: + चर = शनैश्चर |
| चक्षुस्तेज | चक्षु: + तेज = चक्षुस्तेज |
| निर्विवाद | नि: + विवाद = निर्विवाद |
| पुनरुक्ती | पुन: + उक्ती = पुनरुक्ती |
| अध:पतन | अध: + पतन = अध:पतन |
| रज:कण | रज: + कण = रज:कण |
| निर्लोभ | नि: + लोभ = निर्लोभ |
| दुरात्मा | दु: + आत्मा = दुरात्मा |
| मनोगत | मन: + गत = मनोगत |
| मन:पटल | मन: + पटल = मन:पटल |
| घामोळे | घाम + ओळे = घामोळे |

## समास :

शब्दांच्या एकत्रीकरणास समास असे म्हणतात. समासात एक जोडशब्द तयार करताना त्या शब्दांतील परस्परसंबंध दाखविताना त्यातील विभक्तिप्रत्यय किंवा शब्द आपण गाळतो. सामासिक शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला आहे, हे स्पष्ट करण्यासाठी आपण फोड करून सांगतो. फोड करुन विग्रह दाखविण्याच्या पध्दतीला विग्रह असे म्हणतात.



## समासाचे प्रकार :

समासात कमीत कमी दोन शब्द किंवा पदे एकत्र येतात. दोन शब्दांपैकी कोणत्या पदाला वाक्यात महत्व अधिक असते, यावरुन समासाचे प्रकार ठरविण्यात आलेले आहेत.

1) पहिले पद प्रमुख : अव्ययीभाव समास
2) दुसरे पद प्रमुख : तत्पुरुष समास
3) दोन्ही पदे महत्वाची : द्वंद्व समास
4) दोन्ही पदे महत्वाची नसून त्यावरुन तिस-याच पदाचा बोध : बहुव्रीही समास

## 1) अव्ययीभाव समास :

जेव्हा समासातील पहिले पद महत्वाचे असते व या सामासिक शब्दाचा वापर क्रियाविशेषणा सारखा केलेला असतो, तेव्हा अव्ययीभाव समास होतो.

उदा :

| | | |
|---|---|---|
| आजन्म | : | जन्मापासून |
| यथाशक्ती | : | शक्तींप्रमाणे |
| प्रतिदिन | : | प्रत्येक दिवशी |
| प्रतिक्षण | : | प्रत्येक क्षणाला |

या उदाहरणांत आ, यथा, प्रति हे संस्कृतमधील उपसर्ग आहेत. संस्कृतमध्ये उपसर्गांना अव्ययेच मानतात. हे उपसर्ग प्रारंभी लागून बनलेले वरील शब्द सामासिक शब्द आहेत. त्यांचा वर दिल्याप्रमाणे विग्रह करताना या उपसर्गांच्या अर्थांना या सामासिक शब्दांत अधिक महत्व आहे. म्हणून या समासाला प्रथमपदप्रधान समास असेही म्हणतात. शिवाय, एकूण सामासिक शब्द हे क्रियाविशेषण अव्यय आहे, म्हणून त्याला अव्ययीभाव समास असे म्हणतात.

उदा :

दररोज, हरहमेशा, बिनधोक, बेलाशक, गैरशिस्त, बरहुकूम, दरमजल, बिनशर्त, बेमालूम, गैरहजर

(या शब्दांमध्ये फारसी उपसर्ग आहेत)

गावोगाव, जागोजाग, गल्लोगल्ली, रात्रंदिवस, पदोपदी, घरोघर, दारोदार, रस्तोरस्ती, दिवसेंदिवस, पावलोपावली

(या शब्दांमध्ये मराठी शब्दांची व्दिरुक्ती करण्यात आलेली असून क्रियाविषणाप्रमाणे वापरली आहेत. मात्र या शब्दांमध्ये संस्कृत किंवा फारसी समासाप्रमाणे आरंभीचा शब्द अव्यय नाही. काही शब्दांतील प्रथमपदाच्या अंती ओ कार आलेला आहे. तरी एकंदरीत त्याचे स्वरुप क्रियाविशेषण अव्ययाचे असल्यामुळे ही मराठीतील अव्ययीभाव समासाची उदाहरणे आहेत.

## तत्पुरुष समास :

ज्या समासातील दुसरे पद महत्वाचे असते व अर्थाच्या दृष्टीने गाळलेला शब्द किंवा विभक्तिप्रत्यय विग्रह करताना घालावा लागतो. त्यास तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदा : तोंडपाठ (तोंडाने पाठ)

कंबरपट्टा (कंबरेसाठी पट्टा)

महादेव ( महान असा देव)

अनष्टि ( नाही इष्ट ते)

### समानाधिकरण तत्पुरुष समास

तत्पुरुष समासातील दोन्ही पदे केव्हा केव्हा विग्रहाच्या वेळी एकाच विभक्तीत असतात. त्यास समानाधिकरण तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदा : काळमांजर (काळे असे मांजर)

### व्याधिकरण तत्पुरुष समास

केव्हा केव्हा दोन्ही पदे भिन्न अशा विभक्तीत असतात. या प्रकारास व्याधिकरण तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदा : देवपूजा (देवाची पूजा)

## तत्पुरुष समासाचे प्रकार :

### अ) विभक्ति तत्पुरुष समास :

ज्या तत्पुरुष समासात कोणत्या तरी विभक्तीचा अर्थ व्यक्त करणा-या शब्दयोगी अव्ययाचा लोप करुन दोन्ही पदे जोडली जातात, त्यास विभक्ति-तत्पुरुष समास असे म्हणतात. या समासाचा विग्रह करताना एका पदाचा दुस-या पदाशी असलेला संबंध ज्या विभक्तिप्रत्ययाने दाखविला जातो, त्याच विभक्तीचे नाव त्या समासास दिले जाते.

| समास | सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|---|
| व्दितीय तत्पुरुष समास | दु:खप्राप्त | दु:खाला प्राप्त |
| | कृष्णाश्रित | कृष्णाला आश्रित |
| | देशगत | देशाला गत |
| तृतीया तत्पुरुष समास | भक्तिवश | भक्तीने वश |
| | गुणहीन | गुणांनी हीन |
| | बुध्दिजड | बुध्दीने जड |
| चतुर्थी तत्पुरुष | क्रीडांगण | क्रीडेसाठी अंगण |

| | | |
|---|---|---|
| | गायरान | गायीसाठी रान |
| | वाटखर्च | वाटेसाठी खर्च |
| पंचमी तत्पुरुष | ऋणमुक्त | ऋणातून मुक्त |
| | चोरभय | चोरापासून भय |
| | गर्भश्रीमंत | गर्भापासून श्रीमंत |
| षष्ठी तत्पुरुष | राजपुत्र | राजाचा पुत्र |
| | देवपूजा | देवाची पूजा |
| | विद्याभ्यास | विद्येचा अभ्यास |
| सप्तमी तत्पुरुष | घरजावई | घरातील जावई |
| | वनभोजन | वनातील भोजन |
| | स्वर्गवास | स्वर्गातील वास |

तत्पुरुष समासात काही सामासिक शब्द वेगवेगळ्या विभक्तींमध्ये देखील असू शकतात.

उदा : गावदेवी : गावची देवी (षष्ठी तत्पुरुष समास), गावातील देवी (सप्तमी तत्पुरुष)

चोरभय : चोराचे भय (षष्ठी तत्पुरुष), चोरापासून भय ( पंचमी तत्पुरुष)

## आ) अलुक् तत्पुरुष समास :

ज्या विभक्ती तत्पुरुष समासात पूर्वपदाच्या विभक्तिप्रत्ययाचा लोप होत नाही, त्यास अलुक् तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदा : अग्रेसर , युधिष्ठिर, पंकेरुह, कर्तरिप्रयोग, कर्मणिप्रयोग, सरसिज

या शब्दांच्या पहिल्या पदातील अग्रे, युधि, पंके, कर्तरि, कर्मणि, सरसि ही त्या त्या शब्दांची संस्कृतमधील सप्तमीची रूपे न गाळता तशीच राहिली आहेत. (अलुक् म्हणजे लोप न होणारे )

## इ) उपपद तत्पुरुष समास :

काही सामासिक शब्दांतील दुसरी पदे धातुसाधित किंवा कृदन्ते असतात व ही कृदन्ते अशी असतात की, त्यांचा वाक्यात स्वतंत्रपणे उपयोग करता येत नाही. अशा समासास उपपद किंवा कृदन्त तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदा : पंकज = पंकात (चिखलात) जन्मणारे ते

जलद = जल देणारे ते

ग्रंथकार = ग्रंथ करणारा

मार्गस्थ = मार्गावर असणारा (राहणारा)

शेषशायी = शेषावर निजणारा
सुखद = सुख देणारा/देणारे
देशस्थ = देशात राहणारा

उपरोक्त सर्वच शब्द तत्सम आहेत. मात्र उपपद तत्पुरुष समासात केवळ तत्सम शब्दच असतात असे नाही.

**काही मराठी शब्द :**

शेतकरी = शेती करणारा
कामकरी = काम करणारा
आगलाव्या = आग लावणारा
भाजीविक्या = भाजी विकणारा
पहारेकरी = पहारे करणारा
गळेकापू = गळे कापणारा
मळेकरी = मळे करणारा

## ई) नञ् तत्पुरुष समास :

ज्या तत्पुरुष समासातील पहिले पद नकारार्थी असते, त्यास नञ् तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदा : अपुरा = पुर्ण नसलेला
नास्तिक = आस्तिक नसलेला
अयोग्य = योग्य नव्हे ते
अनादर = आदर नसणे
नापसंत = पसंत नसलेला
अन्याय = न्याय नसलेले
अहिंसा = हिंसा नसणे
नाइलाज = इलाज नसणे
बेडर = डर (भिती) नसलेला
गैरहजर = हजर नसलेला

वरील शब्दांमध्ये पहिली पदे अ, अन्, न, ना, बे, नि, गैर यांसारखी अभाव किंवा निषेध दर्शविणारी आहेत. म्हणजेच ती नकार दर्शविणारी आहेत.

## उ) कर्मधारय समास :

ज्या तत्पुरुष समासातील दोन्ही पदे एकाच विभक्तीत असतात म्हणजे प्रथमा विभक्तीत असतात, तेव्हा त्यास कर्मधारय समास असे म्हणतात.

उदा : महादेव = महान असा देव

घनश्याम = घनासारखा शाम

यातील शक्यतो पहिले पद विशेषण असून दुसरे पद नाम असते.

यातील दोन्ही पदांतील संबंध विशेषण-विशेष्य किंवा उपमान-उपमेय अशा स्वरूपाचा असतो.

उदा : रक्तचंदन = रक्तासारखे चंदन

मुखकमल = मुख हेच कमल

**उपप्रकार :**

**1) विशेषण पूर्वपद :**

सामासिक शब्दातील पहिले पद विशेषण : रक्तचंदन, नीलकमल, पीतांबर

**2) विशेषण उत्तरपद :**

**सामासिक शब्दातील दुसरे पद विशेषण :** घननील, पुरुषोत्तम, भाषांतर

**3) विशेषण उभयपद :**

**सामासिक शब्दातील दोन्ही पदे विशेषण :** पांढराशुभ्र, श्यामसुंदर, लालभडक,

**4) उपमान पूर्वपद :**

**सामासिक शब्दातील पहिले पद उपमान असते :**

कमलनयन = कमळासारखे डोळे

मेघश्याम = मेघासारखा काळा

चंद्रमुख = चंद्रासारखे मुख

**5) उपमान उत्तरपद :**

**सामासिक शब्दातील दुसरे पद उपमान असते :**

नरसिंह = सिंहासारखा नर

मुखचंद्र = चंद्रासारखे मुख

चरणकमल = कमलासारखे चरण

**6) रूपक उभयपद :**

**सामासिक शब्दातील दोन्ही पदे एकरूप असतात.**

विद्याधन = विद्या हेच धन

काव्यामृत = काव्यरूपी अमृत

## ऊ) द्विगू समास :

ज्या कर्मधारय समासातील पहिले पद संख्याविशेषण असते व त्या सामासिक शब्दावरून एका समुच्चयाचा अर्थ दर्शविला जातो, तेव्हा त्यास द्विगू समास असे म्हणतात.

हा समास नेहमी एकवचनात असतो.

हा समास कर्मधारय समासच असतो, त्यामुळे त्याला संख्यापूर्वपद कर्मधारय समास असे म्हणतात.

उदा : पंचवटी = पाच वडांचा समूह

नवरात्र = नऊ रात्रींचा समूह

चातुर्मास = चार मासांचा समूह

त्रिभुवन = तीन भुवनांचा समूह

सप्ताह = सात दिवसांचा समूह

बारभाई = बारा भाईचा समूह

## ए) मध्यमपदलोपी समास :

काही सामासिक शब्दातील पहिल्या पदाचा दुस-या पदाशी संबंध दाखवणारी मधली काही पदे लोप करावी लागतात म्हणून या समासाला मध्यमपदलोपी समास असे म्हणतात. या सामासिक शब्दाचा विग्रह करताना **युक्त, द्वारा, पुरता, असलेला** अशांसारखी गाळली गेलेली पदे घालावी लागतात. म्हणून या समासाला लुप्तपद कर्मधारय समास असेही म्हणतात.

उदा : कांदेपोहे = कांदे घालून केलेले पोहे

साखरभात = साखर युक्त भात / साखर घालून केलेला भात

चुलतसासरा = नव-याचा चुलता या नात्याने सासरा

डाळवांगे = डाळयुक्त वांगे

पुरणपोळी = पुरण भरून तयार केलेली पोळी

लंगोटी मित्र = लंगोटी घालत असल्यावेळेपासूनचा मित्र

घोडेस्वार = घोडा असलेला स्वार

मावसभाऊ = मावशीचा मुलगा या नात्याने भाऊ

## ३) द्वंद्व समास :

ज्या समासातील दोन्ही पदे अर्थदृष्ट्या प्रधान म्हणजे समान दर्जाची असतात, त्यास द्वंद्व समास असे म्हणतात. **आणि, व, अथवा, किंवा** या उभयान्वयी अव्ययांनी ही पदे जोडलेली असतात.

द्वंद्व समासाचे तीन प्रकार पडतात :

## अ) इतरेतर द्वंद्व समास :

समासविग्रह करताना **आणि व** या समुच्चयबोधक अव्ययांचा उपयोग :

उदा : आईबाप = आई आणि बाप

हरिहर = हरि आणि हर

स्त्रीपुरुष = स्त्री आणि पुरुष
अहिनकुल = अहि आणि नकुल
कृष्णार्जुन = कृष्ण आणि अर्जुन

## आ) वैकल्पिक द्वंद्व समास :

समासविग्रह करताना **किंवा, अथवा, वा** या विकल्प दर्शक उभयान्वयी अव्ययांचा उपयोग :

उदा : खरेखोटे = खरे किंवा खोटे
तीनचार = तीन किंवा चार
बरेवाईट = बरे किंवा वाईट
पापपुण्य = पाप किंवा पुण्य
सत्यासत्य = सत्य किंवा असत्य

## इ) समाहार द्वंद्व समास :

समासविग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचाही त्यात समावेश (समाहार) केलेला असतो. त्यास समाहार द्वंद्व समास असे म्हणतात.

उदा: मीठभाकर = मीठ, भाकरी व इतर साधे खाद्यपदार्थ
चहापाणी = चहा, पाणी व नाष्ट्याचे इतर पदार्थ
भाजीपाला = भाजी, पाला, व इतर पालेभाज्या
केरकचरा = केर, कचरा आणि इतर टाकाऊ वस्तू

## 4) बहुव्रीही समास

बहुव्रीही या सामासिक शब्दातील दोन्ही पदे महत्वाची नसून या दोन पदांशिवाय तिस-याच पदाचा बोध होतो. हा सामासिक शब्द त्या तिस-याच पदाचे विशेषण असते.

उदा : नीळकंठ = नीळा आहे कंठ ज्याचा असा तो (शंकर)
नीळकंठ हे शंकर या तिस-याच नामाचे विशेषण आहे.

पीतांबर हा सामासिक शब्द आपण कर्मधारय समासात आहे, असे म्हणू शकतो, कारण त्याचा विग्रह पिवळे असे वस्त्र असा होईल. मात्र त्याचा विग्रह पिवळे आहे अंबर (वस्त्र) ज्याचे असा तो विष्णू असा देखील होईल.

***बहुव्रीही समासाचे चार प्रकार आहेत.***

## अ) विभक्तिबहुव्रीही समास :

बहुव्रीही समासाचा विग्रह करताना शेवटी एक संबंधी सर्वनाम येते. हे संबंधी सर्वनाम ज्या विभक्तीत असते, तिचेच नाव या समासाला देतात.

उदा : लक्ष्मीकांत = लक्ष्मी आहे कान्ता (पत्नी) ज्याची तो (षष्ठी बहुव्रीही)

गजानान = गजाचे आहे आनन ज्याला, तो.(चतुर्थी बहुव्रीही)

जितेंद्रिय = जित् (जिंकली) आहेत इंद्रिये ज्याने तो (तृतीया)

**विभक्तिबहुव्रीही चे प्रकार**

| प्रकार | सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|---|
| व्दितीय बहुव्रीही | प्राप्तधन | प्राप्त आहे धन ज्यास तो |
| | प्राप्तोदक | प्राप्त आहे उदक ज्यास तो |
| तृतीया बहुव्रीही | जितेंद्रिय | जित् आहेत इंद्रिये ज्याने तो |
| | कृतकृत्य | केले आहे कृत्य ज्याने तो |
| चतुर्थी बहुव्रीही | चौकोन | चार आहेत कोन ज्याला तो |
| | दशमुख | दहा आहेत मुख ज्याला तो |
| पंचमी बहुव्रीही | निर्धन | गेले आहे धन ज्याच्यापासून तो |
| | गतवैभव | गेले आहे वैभव ज्याच्यापासून तो |
| षष्ठी बहुव्रीही | लंबोदर | लंब (मोठे) आहे ज्याचे उदर तो |
| | चक्रपाणि | चक्र आहे ज्याच्या पाणित असा तो |
| सप्तमी बहुव्रीही | भीमादी | भीम आजे आदी ज्यांत ते (पांडव) |
| | नाक | नाही अक(दु:ख) ज्यात तो (स्वर्ग) |

### समानाधिकरण बहुव्रीही समास

बहुव्रीही समासातील दोन्ही पदे केव्हा केव्हा विग्रहाच्या वेळी एकाच विभक्तीत असतात. त्यास समानाधिकरण बहुव्रीही समास असे म्हणतात. उदा : भक्तप्रिय = भक्त आहे प्रिय ज्याला तो (देव)

### व्याधिकरण बहुव्रीही समास

केव्हा केव्हा दोन्ही पदे भिन्न अशा विभक्तीत असतात. या प्रकारास व्याधिकरण बहुव्रीही समास असे म्हणतात. उदा : पद्मनाभ = पद्म आहे ज्याच्या नाभीत (बेंबीत) ज्याच्या तो (विष्णू)

## आ) नञ् बहुव्रीही समास :

बहुव्रीही समासाचे पहिले पद अ, अन, न, नि असे नकारदर्शक असेल तर त्यास नञ् बहुव्रीही समास असे म्हणतात. उदा : अव्यय, अनेक, नपुंसक, अनादी, निरोगी

### इ) सहबहुव्रीही समास :

सामासिक शब्दातील पहिली पदे **सह** किंवा **स** अशी अव्यये असून हा सामासिक शब्द विशेषण असेल, तर त्यास सहबहुव्रीही समास असे म्हणतात. (हा शब्द क्रियाविशेषणासारखा वापरला, तर अव्ययीभाव समास होईल)

उदा : सादर = आदराने सहित असा जो (नमस्कार)
सहकुटुंब = कुटुंबाने सहित असा जो (गृहस्थ)
सफल = फलासहित आहे जे ते (कार्य)
सानंद = आनंदासह (नमस्कार)

### ई) प्रादिबहुव्रीही समास :

बहुव्रीही समासाचे पहिले पद जर **प्र, परा, अप, दुर, सु, वि** अशा उपसर्गांनी युक्त असेल, तर त्यास प्रादिबहुव्रीही समास असे म्हणतात.

उदा : सुलोचना = जिचे डोळे चांगले आहेत ती स्त्री
दुर्गुणी = गुण नाहीत ज्यात असा तो
प्राज्ञ = प्रज्ञा (बुध्दी) आहे ज्याच्याकडे असा तो


### स्वयं अध्ययन :

**सामासिक शब्दांचा विग्रह करुन समासांची नावे लिहा**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ईश्वरनिर्मित | पोटशूळ | कूपमंडूक | जन्मखोड | मेंढवाडा |
| बाइलवेडा | आंबराई | विहग | कृतघ्न | पाखरेविक्या |
| वेशांतर | हिरवागार | भवसागर | बालमित्र | अंथरुणपांघरुण |
| गुळांबा | शंकरपाळे | विटीदांडू | पासनापास | न्यायान्याय |
| दत्तधन | दुतोंडा | चंद्रशेखर | भालचंद्र | घडीघडी |
| षडानन | बोबडगाणी | | | |

## शब्दसिद्धी :

आपल्या भाषेतील मूळ शब्द कोणते, कोणते शब्द आपण इतर भाषांमधून जसेच्या तसे घेतले, काहीत बदल कोणता केला व शब्द कसा बनविला हे पाहणे म्हणजे शब्द कसा बनतो किंवा सिध्द होतो, याला शब्दसिद्धी म्हणतात.




## सिद्ध शब्द आणि साधित शब्द :

### सिद्ध शब्द :

**मूळ धातू किंवा मूळ शब्द म्हणजे सिद्ध शब्द.** जा, ये, कर, बस, बोल, पी यांसारखे मूळ धातू किंवा शब्द भाषेत असतात, त्यांना सिद्ध शब्द म्हणतात.

आपली मराठी भाषा संस्कृत-प्राकृत या भाषांपासून निर्माण झालेली असल्यामुळे त्या भाषांतील शब्दांचा मोठा ठेवा मराठीत आहे.

### तत्सम शब्द :

संस्कृतमधील हजारो शब्द संस्कृत भाषेतील असून ते जसेच्या तसे म्हणजे शब्दांच्या रुपात काही फरक न होता मराठी भाषेत आलेले आहे. अशा शब्दांना तत्सम (तत् सम म्हणजे त्याच्यासारखे) असे म्हणतात.

उदा : **पुष्प, जल, प्रीति, भीति, कर, ग्रंथ, पृथ्वी, भूगोल, विद्वान, भगवान, परंतु, यद्यपि, कर्ण, पर्ण, अरण्य, हस्त, मस्तक, कर्म, अग्नि, नदी, कमल, कवि, गुरु, पिता, पुत्र, कन्या, वृक्ष, उत्सव, सत्कार** इ.

## तद्भव शब्द :

अनेक संस्कृत शब्द मराठीत येताना त्यांच्या मूळ रुपात बदल होतो. ज्या संस्कृत शब्दांच्या मूळ रुपात बदल होऊन ते मराठीत आलेले आहेत, त्या शब्दांना तद्भव शब्द असे म्हणतात.

उदा :

**कान (कर्ण), चाक (चक्र), आग (अग्नि), पान (पर्ण), घर (गृह), पाय(पद), गाव (ग्राम), दूध (दुग्ध), कोवळा (कोमल), ओठ( ओष्ठ), काम (कर्म)**, इ.

## देशी शब्द :

मराठीत असे काही शब्द असतात, की ते तत्सम किंवा तद्भव किंवा परभाषीय नसतात. आपल्या महाराष्ट्रात पूर्वी जे रहिवासी होते, त्यांच्या बोली भाषेतील ते शब्द असावेत. अशा शब्दांची सरळ व्युत्पत्ती मिळत नाही. अशा शब्दांना देशी किंवा देशज शब्द म्हणतात.

उदा :

**झाड**ाच्या **डहाळी**वर **राघू** आणि **लुगडं** नेसलेली **चिमणी झोप**लेली असताना एक **खुळा बोका**, **रेडा** आणि **घोडा** आले. त्यांनी **दगडधोंडे** मारायला सुरुवात केली. ते त्यांच्या **डोक**याला, **डोळ**याला, **पोटा**ला, **पाठी**ला, **कमरे**ला आणि **गुडघ्या**ला लागले.त्यांच्या **हाडां**चा **खुळखुळा** झाला.ते ऐकून **वांग्या**तल्या **ढेकणा**ने **बाजरी**चे **पीठ मुस्काटा**ला लावले.

## अरबी शब्द

**उस्ताद उर्फ बिस्मील्ला** खान **शानदार जमाती**चा **शाहीर** होता.पण नंतर **पैजा** लावून त्याच्यात **फाजील फलाना हैवानी कैफ** आला.तो **पै पै** ला **मोताद** झाला.त्याला **अद्दल** घडली. त्याने **खजील** होऊन **साहेबां**कडे **नक्कल अर्ज** केला की, माझ्या **बक्कल खर्चा**साठी आणि **हाशीला**साठी **मजबूत इनाम मंजूर** केल्याचा **जाहीरनामा** काढा. मला **मुलामा** दिलेली **कनात**ही देण्याचाही **हूकूम** काढावा. मी **जामीना**वर **जाहीर** करतो की, यापुढे **मौज** न करता **मेहनती**ने **कलम** चालवीन आणि **शहरा**वर **अलंगनौबत** नजर ठेवीन

## फारसी शब्द :

एक **गरीब अवलीया साधू गुजराण** करण्यासाठी **हंगामी रियाज** करुन **शहनाई** वाजवायचा. तो **अचानक पेशवा** बनला. मग तो **अस्सल शौकीन** बनून **दरबारा**त **मैफिली** अगर **जलसा** भरवू लागला.त्याची **तनखा** आणि **खुमारी** वाढली.तो **अव्वल जरतारी फारशी**

**पोशाख, शाईची दौत, निशान** आणि **अत्तर** वापरु लागला. **तावदानी मेण्या**त बसू लागला. **शेलका खुराक, खाना** खाऊ लागला. त्यामुळे त्याची **रग** आणि **वजन** वाढले. त्याचे **फडणवीस** आणि सुमारे **हजारो सौदागर** त्याची **खाविंद** म्हणून **सरबराई** आणि **खुशामत** करु लागले. त्यांना तो **अबकारी हप्ता** म्हणून दर महि**न्याला सरकारी दप्तरा**तून **मोहरां**चा **लाखोटा** देऊ लागला. या **हकीकती**चा **खलिता गुन्हेगारां**ना आणि **कामगारां**ना समजल्यावर ते **खफा** होऊन त्यांनी सगळीकडे **दंगाधोपा** सुरु केला. सर्व **चीजवस्तू, किताब** आणि सामान एवढी **कुमक** त्यांनी लुटली. त्यांच्यात **कारभारा**वरुन **खडाजंगी** सुरु झाली. त्यामुळे **दस्तुरखुद्द** साधूला **जाब** देऊन **जेल**मध्ये जावे लागले. त्याला **चाबका**ने मारण्यात आले. त्याची **जहागीरी** आणि **अब्रू**ही गेली. हे ऐकून सर्वजण **लेझीम** खेळू लागले.

## कानडी शब्द :

**आण्णा कांबळे** हा ताई आणि **अक्का** बरोबर **तूप भाकरी**, **आमसूल**, **उडदा**चे **पापड** आणि **कोशिंबीर गडंगनेर** म्हणून खात होता. त्यांना त्यांच्याकडेच **गाजर** आणि **पडवळ विळीने**, **खलबत्त्या**ने की **अडकित्त्या**ने कापायचे हे समजेना. तेवढयात **चिंधीचे मुंडासे** बांधलेला **शिंपी बांबू**ची **परडी** आणि **हंडा** घेऊन आला आणि म्हणाला, तुमची **भांडी** व **पेटी भंगारात** देता का... हे ऐकून **शिकेकाई** लावलेली **अक्का** म्हणाली, तू **बांगडया** भर ...तुझी **मुरकुंडी** वळवीन....तुझ्या खोलीची **किल्ली** माझ्या **चिरगुटाच्या पिशवी**त आहे...

## पोर्तुगीज शब्द :

एक **पगारी** आणि **जुगारी खमीस** घातलेला **पोर्तुगीज पाद्री नाताळा**च्या वेळी **कोबी, पायरी, हापूस, पपई, अननस, फणस, काजू, बटाटे, पाव, बिस्कीट, पेरुचे आचार व तंबाखू** घेऊन **तुरुंगा**त गेला. तेथून पैशांच्या **तिजोरी**च्या आणि **अलमारी**च्या **चाव्या**, **काडतूसांचे घेमेले, बिजागीरीचा बंब, पिंप, इस्त्री, बादली, साबण, शाबुदाणा, परात, मेज, टिकाव** व **रोटी** या वस्तूंचा **लिलाव** करुन कसलाही **पुरावा** न ठेवता **व्हरांडया**त **पलटण**सह **पिस्तूल** दाखवून **पसार** झाला. त्यामुळे **फित** लावलेल्या व **टोपी** घातलेल्या **पोलीसां**च्या **शिरपेचा**ला **फालतू बूच** बसले. त्यासाठी **कर्नल मेस्त्री** हा **लवाद** नेमला.

## गुजराती शब्द :

**हरताळ**ात **इजा** झाल्याने **नानावटी** हा **गुजराती शेट**जी त्यांच्या **दादर**च्या **हवेली**त **पथारी**वर **मावा** व **ढोकळा** खात **रिकामटेकडा** बसला असताना **घी** चा **डबा** आणि **मथळया**चे **चौपडे** घेऊन **सारीळया**चा **दलाल** आला. **शेटजी** त्यांना म्हणाला, आमच्या **वतीने** मी तुमची **भलामण** करतो की, **जेमतेम चरख्या**वर तरी **खादी**चे **सदरे** बनवा आणि **डांगर**ाची **लागवड** करा. मग आपण **दूधपाक** खाऊन **गरबा** खेळू.

## तामिळ शब्द :

**मलय पर्वता**वर **मांजरपाटी** कपडे घालून **टेंगूळ** आलेले **चिल्लेपिल्ले** खेळत होते. काय खेळत होते तर.... **अरिंग मिरिंग.. लवंगा तिरिंग...आपडी थापडी गुळाची पापडी... अटक मटक चवळी चटक...** आणि **ऐलमा पैलमा** खेळल्यावर **सार** आणि **मठठा** प्यायले.

## तेलुगु शब्द :

**बंडी** घातलेला **तांडेल अनारसे तूप** खाऊन **विटी दांडू** खेळत असताना **येळकोट येळकोट** ओरडल्याने **गदारोळ** झाला. तेवढयात एक **तेलुगु आकूमाकु टाळा** लावलेल्या **डबीत लेंडी** घेऊन निघाला असताना **किडूक मिडूक**ांनी त्याला **वेढा** घातला. तेव्हा तो ओरडला, तुला **बुरगुंडा** होईल.

## साधित शब्द :

सिद्ध शब्दांपासून जे शब्द बनतात, त्यांना साधित शब्द म्हणतात. वरील उदाहरणातील जा या सिद्ध शब्दापासून जाऊन, ये पासून येऊन असे शब्द बनतात. आणखी विस्तृत पाहिले तर, कर पासून करुन, कर्ता, करणारा, होकार, प्रतिकार असे शब्द बनतात. त्यांना साधित शब्द असे म्हणतात.

## उपसर्गघटित आणि प्रत्ययघटित शब्द :

### उपसर्गघटित शब्द :

मूळ शब्दाच्या किंवा धातूच्या मागे एक किंवा अधिक अक्षरे लावून काही साधित शब्द बनवितात, या अक्षरांना उपसर्ग असे म्हणतात. ही अक्षरे अव्ययरूप असतात व ती केव्हा केव्हा त्या मूळ धातूचा अर्थ फिरवतात.

उदा : हर या धातूचा मूळ अर्थ हरण करणे किंवा नेणे असा आहे.पण मागे उपसर्ग लागल्यामुळे त्यांच्या मूळ अर्थात कसा बदल होतो, पहा :

आ + हार = **आहार**

वि + हार = **विहार**

सं + हार = **संहार**

प्र + हार = **प्रहार**

परि + हार = **परिहार**

अप + हार = **अपहार**

उप + हार = **उपहार**

हीच गोष्ट इतर धातूंच्या बाबतीतही होते. वरील शब्दांत **आ, वि, सं, प्र, परि, अप, उप** हे उपसर्ग आहेत. उपसर्ग हे स्वतंत्रपणे येत नाहीत.शब्दांच्या पूर्वी उपसर्ग लागून जे शब्द तयार होतात, त्यांना उपसर्गघटित शब्द असे म्हणतात.

## मराठीतील उपसर्गांचे प्रकार :

### 1. संस्कृत उपसर्ग :

| | | |
|---|---|---|
| अति | : | अतिशय, अत्यंत, अतिक्रमण, अतिरेक, अतिप्रसंग |
| अधि | : | अधिपती, अध्यक्ष, अधिकार, अधिकरण, अध्ययन, अधिदैवत |
| अनु | : | अनुकरण, अनुक्रम, अनुभव, अनुवाद, अनुमती, अनुस्वार, |
| अप | : | अपयश, अपमान, अपकार, अपशब्द, अपशकुन, अपराध |
| अभि | : | अभिनंदन, अभिमुख, अभिनय, अभिरुची, अभ्युदय, अभ्यास |
| अव | : | अवतरण, अवमान, अवकृपा, अवगुण, अवनत |
| आ | : | आजन्म, आमरण, आक्रमण, आक्रोश |
| उत् | : | उत्कर्ष, उत्पती, उन्नती, उत्तीर्ण, उद्योग, उत्तम, उत्प्रेक्षा |
| उप | : | उपवास, उपनेत्र, उपाध्यक्ष, उपकार, उपपद |
| दुस् | : | दुष्कृत्य, दुर्जन, दुर्लभ, दुर्गुण |
| निर्, नि | : | निर्गत, निर्धन, निर्लज्ज, निरंतर, निकामी, निरोगी |
| परा | : | पराजय, पराक्रम, पराकष्ठा, पराभव |
| परि | : | परिपाक, परिपूर्ण, परिणाम, परिवार, परिपाठ, परिश्रम |
| प्र | : | प्रबल, प्रगती, प्रवाह, प्रतिदिन, प्रतिध्वनी, प्रत्येक, प्रतिकूल |
| वि | : | विख्यात, विज्ञान, विधवा, विसंगती, विपत्ती, विशेष |
| सम् | : | संस्कार, संस्कृत, संयोग, संगम, संगीत, संतोष, संकल्प |
| सु | : | सुग्रास, सुभाषित, सुकर, सुगम, सुशिक्षित, सुगंध |

### 2. मराठी उपसर्ग :

| | | |
|---|---|---|
| अ-अन् | : | अजाण, अडाणी, अबोल, अनोळखी, |
| आड | : | आडनाव, आडवाट, आडकाठी, आडवळण |
| अद | : | अदपाव, अदशेर, अदकोस |
| अव | : | अवजड, अवघड, अवदसा, अवकळा, अवलक्षण |
| नि | : | निनावी, निकोप, निलाजरा, निकामी |
| पड | : | पडजीभ, पडसाद, पडछाया, पडताळा |
| फट | : | फटफजिती, फटकळ |
| भर | : | भरजरी, भरधाव, भरदिवसा, भरचौकात |

### 3. फारसी व अरबी उपसर्ग :

| | | |
|---|---|---|
| ऐन | : | ऐनहंगाम, ऐनखर्च, ऐनदौलत |
| कम | : | कमनशीब, कमजोर, कमकुवत |
| गैर | : | गैरहजर, गैरशिस्त, गैरसमज, गैरसावध, गैरहिशेबी, गैरसोय |
| दर | : | दररोज, दरसाल, दरमहा, दरमजल |
| ना | : | नाउमेद, नाराज, नापसंत, नालायक |
| बद | : | बदनाम, बदसूर, बदलौकिक, बदफैल |
| बिन | : | बिनचूक, बिनतक्रार, बिनधोक |
| बे | : | बेडर, बेइमान, बे अब्रू, बेदम, बेकायदा |
| सर | : | सरकार, सरदार, सरचिटणीस, सरहद |
| हर | : | हररोज, हरघडी, हरसाल, |

## प्रत्ययघटित शब्द :

शब्दाच्या किंवा धातूच्या पुढे एक किंवा अधिक अक्षरे लावून जे शब्द तयार होतात, अशा अक्षरांना प्रत्यय असे म्हणतात.

उदा : जन् (जन्मणे) या धातूला प्रत्यय लागून जनन, जनक, जननी, जनता, जन्य असे शब्द बनतात. या शब्दांत न, क, नी, ता, य हे प्रत्यय आहेत. असे प्रत्यय लागून बनलेल्या शब्दांना प्रत्ययघटित शब्द असे म्हणतात.

प्रत्यय दोन प्रकारचे असतात :

### 1) कृत् किंवा धातुसाधित :

धातूंना जोडले जातात ते कृत् प्रत्यय. कृत् प्रत्यय जोडल्याने जे शब्द तयार होतात, त्यांना कृदन्त असे म्हणतात.

## 2) तद्धित किंवा नामसाधित :

नामे, सर्वनामे, विशेषणे आणि अव्यये यांना काही प्रत्यय लागून त्यांच्यापासून बनलेल्या शब्दांना तद्धिते म्हणतात.

## धातुसाधिते किंवा कृदन्ते :

### 1. संस्कृत प्रत्यय व त्यापासून बनलेली धातुसाधिते (कृदन्ते)

अ : चोर, देव, सर्प, भाव, लाभ
अक : लेखक, रक्षक, पाचक, तारक, मारक
अन : नयन, चरण, वदन, पालन, वंदन
अना : प्रार्थना, वेदना, कल्पना, तुलना
अनीय : श्रवणीय, रमणीय, पूजनीय
आ : इच्छा, कथा, चिंता
इ-ई : हरि, त्यागी, भाषी
इक : रसिक, पथिक
त : कृत, मृत, हत, रत, भूत
तृ (ता): त्राता, भर्ता, श्रोता, दाता
तव्य : कर्तव्य, श्रोतव्य, गन्तव्य
ति : कृति, स्तुति, नीति, युक्ति, शक्ति
य : कार्य, देय, पेय, त्याज्य, भोग्य

### 2. मराठी प्रत्यय व त्यापासून बनलेली धातुसाधिते

अ : कर, डर, लूट, फूट, खोट, तूट
आ : ओढा, ठेवा, झगडा, ठेचा, वेढा
आई : खोदाई, चराई, घडाई, शिलाई
आऊ : टाकाऊ, जळाऊ, लढाऊ, शिकाऊ
आरी : पुजारी, पिंजारी, रंगारी
आळू : झोपाळू, विसराळू, लाजाळू,
ई : कढी, मोडी, उडी, बुडी,
ईक : सडीक, पडीक, पढीक
ईत : लखलखीत, चकचकीत
ईव : रेखीव, जाणीव, कोरीव, घोटीव, पाळीव

ऊ : चालू, लागू, झाडू
ऊन : करुन, देऊन, बसून, उडून, रडून
खोर : भांडखोर, चिडखोर
णावळ : धुणावळ, लिहिणावळ, दळणावळ
प : दळप, कांडप, वाढप
पी : वाढपी, दळपी, कांडपी
णारा : लिहिणारा, बोलणारा
रा : हसरा, नाचरा, लाजरा, कापरा, दुखरा

## शब्दसाधिते किंवा तद्धिते :

धातूंखेरीज इतर शब्दांना प्रत्यय लागून जे नवीन शब्द तयार होतात, त्यांना शब्दसाधिते किंवा तद्धिते असे म्हणतात.

### 1. संस्कृत प्रत्यय लागून तयार झालेले तद्धित शब्द :

अ : यादव, राघव, पांडव, भार्गव
इक : कायिक, वाचिक, मानसिक, मासिक, धार्मिक
इत : आनंदित, दु:खित, मूर्च्छित
ईन : कुलीन, शालीन, नवीन
कीय : परकीय, राजकीय, स्वकीय
त्व : महत्त्व, विद्वत्व, जडत्व, मूर्खत्व, गुरुत्व
मान : बुद्धिमान, श्रीमान

### 2. मराठी प्रत्यय लागून झालेली शब्दसाधिते :

अ : वेडा, ठेवा, ठेचा, भरडा, गारठा, ओढा
आई : शिलाई, लढाई, विटाई, दांडगाई, खोदाई
ई : मापी, बोली, लाकडी, पितळी
कर : सुखकर, खेळकर, खोडकर, प्रभाकर
करी : शेतकरी, भाडेकरी, वारकरी, पहारेकरी
कट : तेलकट, मातकट, मळकट, पोरकट
की : माणुसकी, उनाडकी, पाटीलकी, शेतकी,
खोर : भांडखोर, चिडखोर, चहाडखोर
वाईक : नातेवाईक, आरथेवाईक
सर : गोडसर, वेडसर, काळसर, ओलसर

## ३. फारसी प्रत्यय लागून झालेली शब्दसाधिते :

| | |
|---|---|
| गर, गार : | सौदागर, जादूगर, गुन्हेगार |
| वान : | बागवान |
| ई : | खुशी, मजुरी, नेकी, हमाली, |
| स्तान : | अरबस्तान, तुर्कस्तान, कबरस्तान |
| गिरी : | गुलामगिरी, मुलुखगिरी |
| दार : | दुकानदार, फौजदार, पोतदार |
| दाणी : | पिकदाणी, अत्तरदाणी |
| बाज : | दारुबाज, नखरेबाज, दगलबाज |
| बंद : | नालबंद, हत्यारबंद, चिरेबंद |
| खाना : | कारखाना, तोफखाना, दवाखाना |
| नवीस : | चिटणवीस, फडणवीस |
| नीस : | चिटणीस, फडणीस |
| आबाद : | औरंगाबाद, हैदराबाद |
| नामा : | हुकुमनामा, करारनामा, पंचनामा, जाहीरनामा |

## अभ्यस्त शब्द :

काही शब्दांमध्ये एकाच शब्दाची किंवा अक्षराची पुनरावृत्ती झालेली असते. अशा प्रकारे अक्षराचे किंवा शब्दाचे व्दित्व (अभ्यस्त) होऊन तयार झालेल्या शब्दाला अभ्यस्त शब्द म्हणतात.

उदा : घरघर, हळूहळू, दगडबिगड, इ.

### अभ्यस्त शब्दांचे तीन प्रकार पडतात :

### 1) पूर्णाभ्यस्त :

एक पूर्ण शब्द जेव्हा पुन:पुन्हा येऊन एक जोडशब्द बनतो, त्याला पूर्णाभ्यस्त शब्द म्हणतात.

उदा :

घरघर, जे जे, लाल लाललाल, मधूनमधून, समोरासमोर, वा वा , तिळतिळ, हालहाल, तुकडेतुकडे, कोणीकोणी, एकएक, मोगोमाग, हळूहळू, पुढेपुढे, हायहाय,इ.

## अंशाभ्यस्त :

केव्हा केव्हा हा शब्द तसाच पुन्हा न येता त्यातील एखादे अक्षर बदलून येते. या अक्षर बदलून आलेल्या शब्दाला वेगळा अर्थ नसतो. स्वतंत्रपणे तो वापरला जात नाही. केवळ निरर्थक अक्षरे वापरुन यमक साधण्याचा प्रयत्न असतो.

उदा :

शेजारीपाजारी, झाडबीड, बारीकसारीक, उरलासुरला, आडवातिडवा, अर्धामुर्धा, अघळपघळ, दगडबिगड, गोडधोड, किडूकमिडूक, घरबीर, उद्याबिद्या.

**काहीवेळा पहिल्या नामाच्या अर्थाचेच नाम जोडून व्दिरुक्ती होते.**

उदा :

कागदपत्र, कामकाज, कपडालत्ता, बाजारहाट, साजशृंगार, बाडबिस्तारा, अक्कलहुशारी, डावपेच, जुलूमजबरदस्ती, अंमलबजावणी, दंगामस्ती, थट्टामस्करी, धनदौलत, मानमरातब, रीतरिवाज

## अनुकरणवाचक :

काही शब्दांत एखाद्या ध्वनीवाचक शब्दाची पुनरुक्ती साधलेली असते.

उदा :

बडबड, किरकीर, गुटगुटीत, कडकडाट, गडगडाट, फडफड, खदखदून, तुरुतुरु, लुटूलुटू, चुटचुट, गडगड, वटवट

# अलंकार :

दागिने किंवा अलंकार माणसाला शोभा देतात. त्याच्या सौंदर्यात भर पडते. त्याप्रमाणे भाषेतही अलंकार असतात व त्यांचा योग्य त्या ठिकाणी वापर केल्यास भाषेच्या सौंदर्यातही भर पडते. भाषेला ज्याच्यामुळे शोभा येते, अशा शब्दरचनेला अलंकार असे म्हणतात.

केव्हा दोन वस्तूंमधील साम्य दाखवून, तर केव्हा विरोध दाखवून, केव्हा नाद निर्माण करणारे शब्द वापरुन , तर केव्हा एखादी कल्पना वाजवीपेक्षा अधिक फुगवून सांगून आपण आपली भाषा अधिक सुंदर किंवा परिणामकारक करण्याचा प्रयत्न करतो. केव्हा शब्दांतील अक्षररचनेमुळे नाद निर्माण होऊन भाषेला शोभा येते, तर केव्हा योजिलेल्या शब्दांमुळे अर्थाचे सौंदर्य खुलून दिसते. यामुळे भाषेच्या अलंकारांचे दोन प्रकार होतात :

1) **शब्दालंकार**

2) **अर्थालंकार**

## शब्दालंकार :

अनेकदा शब्दांच्या विशिष्ट रचनेमुळे काव्यात किंवा गद्यरचनेत सौंदर्य निर्माण होत असते. अशा अलंकारांना शब्दालंकार असे म्हणतात. शब्दालंकाराच्या जाती पुढीलप्रमाणे :

### 1. अनुप्रास :

एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा त्याला सौंदर्य प्राप्त होते, तेव्हा अनप्रास हा अलंकार होतो.

उदा :

**पोटापुरता पसा पाहिजे नको पिकाया पोळी**

**देणा-याचे हात हजारो दुबळी माझी झोळी**

या वाक्यात प , ह आणि ळ ही अक्षरे पुन:पुन्हा आल्यामुळे जो नाद निर्माण होतो, त्यामुळे या काव्यपंक्तीला शोभा आली आहे.

**गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले,**

**शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले.**

**रजनीतल, ताम्रनील**

**स्थिर पल जल पल सलील**

**हिरव्या तटि नावांचा कृष्ण मेळ खेळे**

### 2. यमक अलंकार :

कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठराविक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे वेगळ्या अर्थाने आल्यास यमक हा अलंकार होतो.

उदा : **जाणावा तो ज्ञानी**
**पूर्ण समाधानी**
**नि:संदेह मनी**
**सर्वकाळ**

अनुप्रासात जशी अक्षरांची पुनरावृत्ती असते तशी यमकातही असते. मात्र अनुप्रासात वर्णाची आवृत्ती कोठेही असू शकते, पण यमकात ही आवृत्ती ठराविक ठिकाणीच होत असते : चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठराविक ठिकाणी.

**पुष्ययमक :**

**सुसंगति सदा घडी**
**सुजनवाक्य कानी पडी**
**कलंक मतीचा झडी**
**विषय सर्वथा नावडी**

**दामयमक :**

**आला वसंत कविकोकिल हाही आला**
**आलापिती सुचविती अरुणोदयाला**

## 3. श्लेष अलंकार :

एकच शब्द वाक्यात दोन अर्थांनी वापरल्यामुळे जेव्हा शब्दचमत्कृती साधते तेव्हा श्लेष हा अलंकार होतो.उदा : **सुनील : काय करतोस**
**अनिल : काय नाही, पडलोय**
**सुनील : पडलास ? लागलं का मग ?**

या संवादात पडला या शब्दाच्या दोन अर्थांनी दोघेही बोलत असल्यामुळे थोडी गंमत घडते. पडला या शब्दाचे दोन अर्थ होतात : निवांत पहुडलेले (निजलेले) असणे आणि दुसरा अर्थ म्हणजे कुठून तरी पडणे.

श्लेष म्हणजे अलिंगन किंवा मिठी. एकाच शब्दाला दोन अर्थांची मिठी बसलेली असते, म्हणजे दोन अर्थ चिकटलेले असतात. त्यामुळे एका शब्दाचे दोन अर्थ निघतात. श्लेष हा शब्दालंकार आहे व अर्थालंकार देखील आहे.

उदा : **सूर्य उगवला झाडीत...**
**झाडूवाली आली रस्ता झाडीत...**
**शिपाई आले गोळ्या झाडीत...**
**अन् वाघही आला तंगड्या झाडीत...**

उपरोक्त वाक्यांमध्ये झाडीत या शब्दावर श्लेष करण्यात आलेला आहे. प्रत्येक वाक्यात झाडीत शब्दाला वेगवेगळा अर्थ आहे.

श्लेष हा शब्दालंकार आहे व अर्थालंकार देखील आहे.

## शब्दश्लेष :

वाक्यात दोन अर्थ असणा-या शब्दाबद्दल दुस-या अर्थाचा शब्द ठेवल्यास श्लेष नाहीसा झाला, तर तो शब्दश्लेष होय.

उदा : **मित्राच्या उदयाने सर्वांनाच आनंद होतो.**

**हे मेघा, तू सर्वांना जीवन देतोस**

या वाक्यांमध्ये मित्र ऐवजी त्याच अर्थाचे दोस्त, सखा हे शब्द ठेवले, किंवा जीवन शब्दाऐवजी पाणी, जल हे शब्द ठेवले, तर त्यातील श्लेष नाहीसा होतो. म्हणून हा शब्दश्लेष होय

## अर्थश्लेष :

वाक्यात दोन अर्थ असणा-या शब्दाबद्दल दुस-या अर्थाचा शब्द ठेवल्यास श्लेष कायम राहिल्यास त्यास अर्थश्लेष म्हणतात.

उदा : **तू मलिन, कुटिल, नीरस जडहि पुनर्भवपणेहि कच साच**

या आर्येतील मलिन, कुटिल, नीरस, जड हे शब्द बदलून त्याच अर्थाने दुसरे शब्द वापरले, तरी श्लिष्ट अर्थ नाहीसा होत नाही.

## सभंग श्लेष :

शब्दाचे दोन अर्थ आहेत, हे लक्षात येण्यासाठी त्या त्या शब्दाची विशिष्ट प्रकारे फोड करावी लागत असेल तर या प्रकारच्या श्लेषाला सभंग श्लेष असे म्हणतात.

उदा : 1) **श्रीकृष्ण नवरा मी नवरी....**

**शिशुपाल नवरा मी न-वरी**

2) **कुस्करु नका ही सुमने....**

**जरी वास नसे तिळ यांस, तरी तुम्हास अर्पिली ही सु-मने**

3) **चला ना गडे...**

**चला नागडे**

### अभंग श्लेष :

शब्द जसाच्या तसा ठेऊन त्याचे जेव्हा दोन अर्थ संभवतात, त्यास अभंग श्लेष म्हणतात.

उदा : **ते शीतलोपचारे जागी झाली हळूच मग बोले ।**

**औषध <u>नलगे</u> मजला, परिसुनी माता बरे म्हणुनि डोले ।।**

## अर्थालंकार :

अनेकदा शब्दांच्या अर्थामुळे काव्यात किंवा गद्यरचनेत सौंदर्य निर्माण होत असते. अर्थलंकाराच्या संदर्भात  आपल्या एक गोष्ट लक्षात येते की, आपल्याला जे सांगावयाचे आहे, ते प्रभावी रीतीने सांगण्यासाठी त्याच्यासारख्याच दुस-या गोष्टीची आपण मदत घेतो. त्याची तुलना करतो.

अर्थलंकाराच्या दृष्टीने पुढील संकल्पना महत्वाच्या आहेत :

अ) उपमेय : ज्याची तुलना करावयाची आहे, ते किंवा ज्याचे वर्णन करावयाचे आहे, तो घटक

ब) उपमान : ज्याच्याशी तुलना करावयाची आहे, किंवा ज्याची उपमा दिली जाते, तो घटक

क) साधारणधर्म : दोन वस्तूंत असणारा सारखेपणा किंवा दोन वस्तूंतील समान गुणधर्म

ड) साम्यवाचक शब्द : वरील सारखेपणा दाखविण्यासाठी वापरला जाणारा शब्द

## अर्थालंकाराचे प्रकार :

### 1. उपमा :

दोन वस्तूंतील साम्य चमत्कृतीपूर्ण रीतीने जेथे दाखविलेले असते, तेथे उपमा हा अलंकार होतो. उपमेत एक वस्तू दुस-यासारखी आहे, असे वर्णन असते.

उदा :

1) **मुंबईची घरे मात्र लहान... कबुतराच्या <u>खुराड्यासारखी</u> ...**

2) **सावळाच रंग तुझा पावसाळि <u>नभापरी</u>**

3) **<u>आभाळागत</u> माया तुझी आम्हांवरी राहू दे**

सामान्यत: उपमा अलंकारात सारखा, **जसा, जेवि, सम, सदृश, गत, परी, समान** यांसारखे साम्यवाचक शब्द येतात.

### 2. उत्पेक्षा :

उत्प्रेक्षा म्हणजे कल्पना. ज्या दोन वस्तूंची आपण तुलना करतो, त्यांतील एक (उपमेय) ही जणू काही दुसरी वस्तू (उपमान) च आहे, अशी कल्पना करणे, याला उत्प्रेक्षा अलंकार म्हणतात.

उदा :

1) **ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू...**

2) **किती माझा कोंबडा मजेदार । मान त्याची किती बाकदार ।**
**शिरीभागी तांबडा तुरा हाले । जणू जास्वंदी फूल उमललेले ॥**
**अर्धपायी पांढरीशी विजार । गमे विहगांतिल बडा फौजदार ॥**

- उपमेय हे जणू उपमानच आहे, असे जेथे वर्णिलेले असते, तेथे उत्प्रेक्षा अलंकार होतो.
- उत्प्रेक्षा अलंकारात **जणू, जणूकाय, गमे, वाटे, भासे, की** यांसारखे साम्यवाचक शब्द येतात.
-

## 3. रूपक :

उपमेय व उपमान यांच्यात एकरूपता आहे, ती भिन्न नाहीत असे वर्णन जेथे असते, तेथे रूपक हा अलंकार असतो.

उदा :

1) **बाई काय सांगो । स्वामीची ती दृष्टी ।**
**अमृताची वृष्टी । मज होय ॥**
(स्वामींची दृष्टी व अमृताची वृष्टी ही दोन्ही एकरूपच मानली आहेत)

2) **ऊठ पुरुषोत्तमा । वाट पाहे रमा ।**
**दावि मुखचंद्रमा । सकळिकांसी ॥**
( येथे मुख (उपमेय) व चंद्र (उपमान) ही एकरूप मानून मुखचंद्रमा असा शब्दप्रयोग केला आहे)

3) **लहान मूल म्हणजे मातीचा गोळा. आकार द्यावा तशी मूर्ती घडते.**
( येथे लहान मूल हे मातीच्या गोळ्यासारखे असते असे म्हणत उपमेय व उपमान यांच्यातील केवळ सादृश्य न दाखविता त्यांच्यातील अभेद वर्णिलेला आहे.

- उपमेत एक वस्तू दुस-यासारखी आहे (सादृश्य) आहे असे वर्णन असते.
- उपमेच्या थोडे पुढे जाऊन उत्प्रेक्षेत त्या दोन वस्तू जवळजवळ सारख्या (एकत्व) असल्याची कल्पना केलेली असते.
- रूपकात आणखी थोडे पुढे जाऊन त्या दोन वस्तू म्हणजे उपमेय व उपमान या एकरूप असल्याचे स्पष्टपणाने सांगितलेले असते. उत्प्रेक्षेप्रमाणे त्यात गुळमुळीतपणा नसतो.

## 4. अनन्वय :

उपमेय हे केव्हा केव्हा एखादया गुणाच्या बाबतीत इतके अद्वितीय असते की त्याला योग्य असे उपमान मिळू शकत नाही. उपमेयाची तुलना उपमेयाशीच करावी लागते.

उपमेयाला दुस-या कशाचीच उपमा देत येत नसेल म्हणजे जेव्हा उपमेयाला उपमेयाचीच उपमा दिली जाते, तेव्हा अनन्वय अलंकार होतो. अन्वय म्हणजे तुलना. अनन्वय म्हणजे तुलना नसणे. ज्या वाक्यात तुलना करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही, तो अनन्वय.

उदा : 1) **झाले बहु... होतिल बहु... आहेतहि बहु...परि यासम हा**

2) **आहे ताजमहाल एक जगती तो तोच त्याच्यापरी**

3) **कर्णासारखा दानशूर कर्णच...**

## 5. अपन्हुती :

अपन्हुती म्हणजे झाकणे किंवा लपवणे . उपमान हे उपमेयाचा निषेध करून ते उपमानच आहे असे जेव्हा सांगितले जाते, तेव्हा अपन्हुती अलंकार होतो.

उदा : 1) **न हे नयन, पाकळ्या उमलल्या सरोजातिल ।**
**न हे वदन, चंद्रमा शरदिचा गमे केवळ ॥**

2) **ओठ कशाचे....देठचि फुलल्या पारिजातकाचे**

3) **मानेला उचलिती, बाळ मानेला उचलिती ।**
**नाही ग बाई, फणा काढुनि नाग हा डोलती ॥**

## 6. व्यतिरेक :

व्यतिरेक म्हणजे अधिक्य. उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे, असे वर्णन केलेले असेल तर व्यतिरेक हा अलंकार होतो. उपमेयाचे उपमानावर अधिक्य. हे अधिक्य दोन प्रकारांनी दाखविता येते.

1) **उपमेयाच्या उत्कर्षाने**

2) **उपमानाच्या अपकर्षाने**

उदा : 1) **तू माउलीहून मयाळ । चंद्राहूनि शीतळ ।**
**पाणियाहूनि पातळ । कल्लोळ प्रेमाचा ।**

2) **सावळा ग रामचंद्र । रत्नमंचकी झोपतो ।**
**त्याला पाहता लाजून । चंद्र आभाळी लोपतो ।**

3) **कामधेनूच्या दुग्धाहूनिही ओज हिचे बलवान**

## 7. भ्रांतिमान :

उपमानाच्या जागी उपमेयच आहे असा भ्रम निर्माण होऊन तशी काही कृती घडली तर तेथे भ्रांतिमान अलंकार असतो. कवी ज्याचे वर्णन करत आहे, त्या पात्राच्या मनात निर्माण झालेला भ्रम दाखविण्यासाठी त्याची भ्रांतिमान अलंकार वापरला जातो.

उदा : 1) **हंसा विलोकुनि सुधाकर अष्टमीचा ।**
**भ्यां मानिला निटिलदेश तिचाच साचा ।**
**शंख-द्वयी धरुनि कुंकुम कीरवाणी ।**
लावावया तिलक लांबविला स्वपाणि ।

(अष्टमीचा चंद्र हा दमयंतीचा भालप्रदेश असावा, अशी समजूत करुन घेऊन तिच्या कपाळावर कुंकवाचा टिळा लावण्यासाठी नळ राजाने आपला हात लांब केला )

2) **भृंगी विराजित नवीं अरविंदपत्रे. ।**
**पाहूनि मानुनि तिचीच विशाल नेत्रे ।**
**घालीन अंजन अशा मतिनें तटाकी ।**
**कांते वृथा उतरली, भिजली विलोकी ।**

(भुंग्यांनी सुशोभित झालेली कमलपत्रे हे दमयंतीचे नेत्रच आहेत, असे समजून तिच्या डोळ्यांत अंजन घालावयास नलराजा पुढे सरसावला व पाण्यामुळे भिजला)

## 8. ससंदेह :

भ्रान्तिमान अलंकारात उपमान हे उपमेय आहे असा जो भ्रम होतो, तो निश्चित असतो पण उपमेय कोणते व उपमान कोणते असा संदेह किंवा संशय निर्माण होऊन मनाची जी द्विधा अवस्था होते, त्यावेळी ससंदेह हा अलंकार असतो. म्हणजे हा का तो असा गोंधळ असतो.

उदा : **चांदण्या रात्री गच्चीवर पत्नीच्या मुखाकडे पाहताना प्रियकराला वाटले :**
**कोणता मानू चंद्रमा ? भूवरीचा की नभीचा ?**
**चंद्र कोणता ? वदन कोणते ?**
**शशांक-मुख की मुख-शशांक ते ?**
**निवडतील निवडीत जाणते**
**मानी परि मन सुखद संभ्रमा-मानू चंद्रमा, कोणता ?**

## ९. अतिशयोक्ती :

कोणतीही कल्पना आहे त्याच्यापेक्षा खूप फुगवून सांगताना त्यातील असंभाव्यता अधिक स्पष्ट करून सांगितलेली असते. त्यावेळी अतिशयोक्ती हा अलंकार होतो.

उदा : **दमडीच तेल आणलं....सासूबाईंच न्हाणं झालं...**

**मामंजींची दाढी झाली...भावोजींची शेंडी झाली...**

**उरलं तेल झाकून ठेवल.. लांडोरीचा पाय लागला...**

**वेशीपर्यंत ओघळ गेला...त्यात उंट पोहून गेला...**

यात असंभाव्यतेची परिसीमा असते. असंभाव्य किंवा अशक्य गोष्टी शक्य झाल्याचे वर्णन जेथे असते, तेथे अतिशयोक्ति हा अलंकार होतो.

## 10. दृष्टान्त :

एखाद्या विषयाचे वर्णन करून झाल्यावर ती गोष्ट पटवून देण्यासाठी त्याच अर्थाचा एखादा दाखला किंवा उदाहरण दिल्यास दृष्टान्त अलंकार होतो.

**उदा : लहानपण देगा देवा ।**

**मुंगी साखरेचा रवा ।**

**ऐरावत रत्न थोर ।**

**त्यासी अंकुशाचा मार ।**

उपमेमध्ये सादृश्य दाखविताना जसे, जेवी, सम, सारखा असे शब्द येतात, मात्र दृष्टान्तात सादृश्य दाखविणारे साम्यवाचक शब्द नसतात. हा या दोन अलंकारांतील फरक आहे.

**न कळता पद अग्निवरी पडे । न करि दाह असे न कधी घडे ।**

**अजित नाम वदो भलत्या मिसे । सकल पातक भस्म करीतसे ।**

## 11. अर्थान्तरन्यास :

एखाद्या सामान्य विधानाच्या समर्थनार्थ विशेष उदाहरणे किंवा विशेष उदाहरणांवरून शेवटी एखादा सामान्य सिध्दांत काढला, तर अर्थान्तरन्यास हा अलंकार होतो. अर्थान्तर म्हणजे दुसरा अर्थ. न्यास म्हणजे शेजारी ठेवणे. अशा प्रकारे एका अर्थाचा समर्थक असा दुसरा अर्थ त्याच्या शेजारी ठेवणे, असा या अलंकाराचा अर्थ आहे.

**उदा : बोध खलास न रुचे अहिमुखी दुग्ध होय गरल ।**

**श्वानपुच्छ नलिकेत घातले होईना सरळ ॥**

## 12. स्वभावोक्ती :

एखाद्या व्यक्तीचे, प्राण्याचे, वस्तूचे त्याच्या स्वाभाविक स्थितीचे किंवा हालचालींचे यथार्थ (हुबेहूब) पण वैशिष्ट्यपूर्ण वर्णन जेव्हा केलेले असते, तेव्हा त्यास स्वभावोक्ती अलंकार म्हणतात.

उदा : **मातीत ते पसरले अतिरम्य पंख ।**
**केले वरी उदर पांडुर निष्कलंक ॥**
**चंचू तशीच उघडी पद लांबविले ।**
**निष्प्राण देह पडला श्रमही निमाले ॥**

**गणपत वाणी विडी पिताना... चावायाचा नुसताच काडी...**
**म्हणायचा अन् मनाशीच की... या जागेवर बांधित माडी...**
**मिचकावुनी मग उजवा डोळा... आणि उडवुनि डावी भिवई..**
**भिरकावुनि ती तशिच द्यायचा... लकेर बेचव जैशी गवई..**

## 13. अन्योक्ती :

अन्योक्ती म्हणजे अन्य व्यक्तीला उद्देशून बोलणे. कित्येक वेळा एखाद्या व्यक्तीला स्पष्टपणे बोलता येत नाही. अशा वेळी ज्याच्याबद्दल बोलायचे, त्याच्याबद्दल काहीच न बोलता दुस-याबद्दल बोलून आपले मनोगत व्यक्त करण्याची जी पद्धत असते, तिलाच अन्योक्ती असे म्हणतात. अर्थात, **लेकी बोले सुने लागे** अशा प्रकारची पद्धत असते.

उदा : **येथे समस्त बहिरे लोक । का भाषणे मधुर तू करिशी अनेक ॥**
**हे मूर्ख यांस किमपीही नसे विवेक । रंगावरून तुजला गणतील काक ॥**

## 14. पर्यायोक्त :

एखादी गोष्ट सरळ शब्दांत न सांगता ती अप्रत्यक्ष रीतीने किंवा आडवळणाने सांगणे, यास पर्यायोक्त असे म्हणतात.

उदा : 1) **त्याचे वडील सरकारचा पाहुणचार घेत आहेत..**

2) **काळाने त्याला आमच्यातून हिरावून नेले.**

3) **माझ्या उत्तरपत्रिकेवर खूष होऊन परीक्षकांनी मला वन्समोअर दिला आहे.**

## 15. विरोधाभास :

एखाद्या विधानावर वरवर दिसायला विरोध आहे, असे वाटते, पण वास्तविक तसा विरोध नसतो, अशा ठिकाणी विरोधाभास हा अलंकार असतो.

उदा : 1) **वियोगार्थ मीलन होते नेम हा जगाचा ।**

2) जरी आंधळी मी तुला पाहते.

3) स्वत:साठी जगलास तर मेलास... दुस-यासाठी जगलास तरच जगलास

4) सर्वच लोक बोलू लागले की कोणीच ऐकत नाही.

## 16. सार :

एखाद्या वाक्यातील कल्पना चढत्या क्रमाने मांडून उत्कर्ष किंवा अपकर्ष साधलेला असतो, तेव्हा सार हा अलंकार असतो.

**उदा : आधीच मर्कट .तशातही मद्य प्याला..झाला तशात जरि वृश्चिक दंश त्याला..**
**झाली तयास तदनंतर भूतबाधा... चेष्टा वदू मग किती कपिच्या अगाधा..**

## 17. चेतनगुणोक्ती :

निसर्गातील निर्जीव वस्तू सजीव आहेत, अशी कल्पना करून ती मनुष्याप्रमाणे वागतात किंवा कृती करतात, असे जेथे वर्णन असते, तेथे चेतनगुणोक्ती हा अलंकार होतो.

**उदा : कुटुंबवत्सल इथे फणस हा । कटिखांद्यावर घेऊनि बाळे ।**
**कथिते त्याला कुशल मुलांचे । गंगाजळिचे बेत आगळे ।**

## 18. व्याजस्तुती :

बाह्यत: स्तुती पण आतून निंदा किंवा बाह्यत: निंदा पण आतून स्तुती असे जेथे वर्णन असते, तेथे व्याजस्तुती हा अलंकार होतो.

उदा : **काय विद्वान आहेस रे तू !**
**केवढा उदार रे तू !**

## 19. व्याजोक्ती :

एखाद्या गोष्टीचे खरे कारण लपवून दुसरेच कारण देण्याचा जेथे प्रयत्न केला जातो, तेथे व्याजोक्ती हा अलंकार होतो.

उदा : 1) **येता क्षण वियोगाचा पाणी नेत्रांमध्ये दिसे ।**
**'डोळ्यांत काय गेले हे ?' म्हणूनी नयना पुसे ॥**

2) **'काय गे बघशी मागे वळूनि अशी ?'**
**विचारिता म्हणे, 'माझी राहिली पिशवी कशी ?'**